प्रांतिक सेवकीय मंडळाकरिता

तयार करण्यात आलेली

“मूलभूत पुस्तिका”

प्रांतिक सेवकीय मंडळाकरिता प्राथमिक साहित्ये

प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लागार समितीने प्रांतिक सेवकीय मंडळाला वापरता यावी याकरिता युरेशियाने विकसीत केलेला अभ्यासक्रम

प्रथमावृत्ती

डिसेंबर, २०११

**क्षेत्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीने सेवकीय मंडळाकरिता तयार करण्यात आलेली "मूलभूत पुस्तीका" युरेशियाने तयार केलेल्या अभ्यासक्रमाबद्दल प्रश्न उत्तरे.**

चर्च ऑफ दि नॅझरीनच्या प्रमुख परिषदेने घेतलेल्या निर्णयाच्या उत्तरादाखल, युरेशिया प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लगार मंडळाने या सेवाकार्यात प्रगती व्हावी म्हणुन एक" मूलभूत पुस्तीका" विकसीत केली आहे.
चर्च ऑफ दि नॅझरीन मधील सेवकांना दिक्षा देण्याकरिता प्रमुख परिषदेने नेमूण दिलेल्या आवश्यक बाबींची पुर्तता ते करतात किंवा नाही याची प्रादेशिक सेवकिय मंडळाला मदत व्हावी , या उद्देशाने ही पुस्तीका तयार करण्यात आली आहे.

ही "मूलभूत पुस्तीका" प्रत्येक प्रांताला आणि कार्यक्षेत्राला विस्तृत माहीती पुरवितेजी प्रादेशिक भागातील पुरूषांची आणि स्त्रियांची दीक्षेकरीता तयार करण्यास उपयुक्त ठरेल.

याबद्दल काही प्रश्न उपस्थित होऊ शकतात, त्या प्रश्नांची उत्तरे देण्याकरीता प्रादेशिक अभ्यासक्रम समितीने संपूर्ण क्षेत्रात असलेल्या पुढाऱ्यांकरीता खाली दिल्याप्रमाणे प्रश्न—उत्तरांची मालीक तयार केली आहे.

**१. <u>अभ्यासक्रम काय आहे ?</u>**

चर्च ऑफ दि नॅझरीन च्या एखादया दीक्षेस पात्र उमेदवाराला दीक्षा देते वेळेस त्याच्या शैक्षणिक पात्रतेचे वर्णन करतांना या संवज्ञेचा वापर केला जातो यामध्ये, त्याने वर्गात केलेला अभ्यासक्रम आणि त्याला प्रत्यक्षात मिळालेला कामाचा अनुभव यांची परिणीती म्हणजे त्याची सेवाकार्याकरिता झालेली तयारी, यांचा समावेश होतो. प्रादेशिक सेवकीय मंडळाकरिता तयार करण्यात आलेल्या " मूलभूत पुस्तीकेत " सविस्तर माहीती दिलेली आहे.

**२. <u>"प्रादेशिक मूलभूत पुस्तीका" जगामध्ये ती काय आहे ?</u>**

"एका साच्यात सर्व समावलेले" असे समजून सेवाकार्याकरिता नमुनादाखल असलेले शिक्षण जे अमेरिकेहुन परदेशांत, जेथे मंडळयांची वाढ होत आहे तेथे निर्यात करण्यात आले आहे. परंतु तेथे हा नमूना मंडळयांच्या गरजा भागवू शक्त नाही असा जागतीक मंडळीचा निर्णय आहे. येथे सेवाकार्याबद्दल चा संदर्भ महत्वाचा ठरतो. म्हंणुन असा ठराव करण्यात आला आहे की, अभ्यासक्रमाची छाणनी आणि त्यास देण्यात येणारी मान्यता जागतीक मंडळाच्या पातळीवरून न घेता प्रादेशिक पातळीवर घेण्यात यावी.

परंतु मंडळाने हेही समजून घेतले आहे की, जगातील एका क्षेत्रात दिलेली प्रमाण बध्दता दुसऱ्या इतर जगातील क्षेत्रात दिल्या गेलेल्या दीक्षेबरोबर तुलना करण्याजोगी असली पाहीजे. याचाच अर्थ प्रादेशिक भागात दीक्षा दिलेल्या सेवकाला, तो दुय्यम दर्जाचा दीक्षीत नागरीक आहे, असे समजु नये.

प्रत्येक प्रादेशिक समितीने, त्यांनी स्वतः सेवकांची तयारी करीत असतांना त्यांचा कमित कमी दर्जा कोणता असावा तो त्यांनी स्वतः विकसीत करावा. म्हणजे जगात कोठलीही मंडळी त्यावर विश्वास प्रगट करून त्याचे लागुकरण करील.

युरेशियाने तुम्ही प्रत्येकाने दिलेला प्रतिसाद आणि तुमच्या अपेक्षानुसार "मूलभूत पुस्तीका" विकसीत केली आहे. ही पुस्तीका युरेशियातील प्रादेशिक अभ्यास सल्लागार समीतीने विकसीत केली आहे.

**३. मी युरेशियातील प्रादेशिक अभ्यास सल्लागार समितीबद्दल कधीही ऐकले नाही. ही समिती काय आहे ?**

चर्च ऑफ दि नॅझरीनच्या मंडळीतील सदस्यांना नविन शब्दांची रचना करण्याचे दान मिळाले आहे. त्यांनी नविन तयार केलेला शब्द म्हणजे "प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लागार समिती (RCOSAC) या समितीची प्राथमीक जबाबदारी ही आहे की, त्यांनी दीक्षीतांना कराव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाच्या योजना निरनिराळया संस्थांकडून (जसे की, EuNC (युरेशियन नॅझरीन कॉलेज) EMNBC (इस्टर्न मेडिटेरियन नॅझरीन बायबल कॉलेज), SANBC (साऊथ आशिया नॅझरीन बायबल कॉलेज) NTC Manchester (नॅझरीन थिओलॉजीकल कॉलेज, मॅनचेस्टर) मागवित रहाव्या. प्रांतिक परिषदा बहुदा एखादया प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लगार समितीकडून मान्यताप्राप्त झालेल्या अभ्यासक्रमाचा उपयोग करतात. या समितीला नेमून दिलेले काम म्हणजे त्यांनी अभ्यासक्रमाची छाणनी करावी आणि त्यास मान्यता मिळावी म्हणून अंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समीतीला (ICOSAC) तशी शिफारस करावी.

**४. समीतीचे सभासद कोण ?**

प्रादेशिक शिक्षण व्यवस्थापक (Regional Education Coordinator – REC) समीतीच्या अध्यक्ष पदावर असेल. इतर सभासद प्रादेशिक संचालक (Regional Director RD) सेवक, आणि सामान्य सभासदांचे प्रतिनीधीत्व करणारे, आणि संपूर्ण युरेशिया प्रदेशातील शिक्षक यांचा समावेश असेल.

**५. हे लोक या समीतीचे सभासद का असावे?**

प्रादेशिक शिक्षण व्यवस्थापक (REC) संपूर्ण युरेशिया भागातील शिक्षणासाठी जबाबदार व्यक्ति आहे. मंडळीचे पाळक लोक समितीचे सभासद यासाठी असावे की, ते या विषयावर चर्चा चालु असतांना आपल्या सेवकार्याचा अनुभव सांगु शकतात. सामान्य सभासद ते आहेत जे मंडळीतील सामान्य सभासदांचे प्रतिनीधीत्व करतात, आणि त्यांचे मत महत्वाचे ठरते. संपूर्ण युरेशिया प्रदेशातील शिक्षक जे अभ्यासक्रम विकसीत करण्यात, योजना तयार करण्यात व त्यांची अमल बजावणी करण्यात तज्ञ आहेत, त्यांचे अनुभव, मुल्यमापन करणे, चर्चा चालू असतांना उपयोगी ठरतात.

**६.प्रत्येक प्रांताला त्यांच्या स्वतःचा अभ्यासक्रम विकसीत करावा लागतो काय?**

नाही.

प्रादेशिक भागांत जे शिक्षण उपलब्ध करून देतात त्यांच्याकडून मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचा उपयोग करून घेण्यास तो प्रांत मोकळा आहे. खरे पाहीले असता सर्वाधिक प्रांत असेच करतात.

परंतु तुम्ही स्वतःचा अभ्यासक्रम विकसीत करण्याचा निर्णय घेत असाल तर त्याकरिता सहाय्य उपलब्ध आहे ( खाली प्रश्न क्रमांक१३ पहा)

**७. तर, प्रत्येक प्रादेशिक प्रांत आपल्या प्रांतामध्ये दीक्षेकरिता जे आवश्यक आहे त्याबद्दल निर्णय घेतात काय ?**

काही मुद्दांपर्यंत होय.

प्रत्येक प्रादेशिक प्रांताला त्यांच्या स्वतःचा अभ्यासक्रम "मुलभुत पुस्तीकेनुसार" विकसीत करून तो अंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम सल्लागार समिती (ICOSAC) कडुन मान्यताप्राप्त करून घेण्याकरीता विचारणा करण्यात आली होती. ते काम युरेशियाने केले आहे. त्याची प्रत ई–मेलवर त्याचप्रमाणे लिखीत स्वरूपात उपलब्ध आहे.

अभ्यासक्रमाची प्रत थोडीफार बंधारण पुस्तका सारखी (Manual) आहे. आपणा सर्वांजवळ ती आहे परंतु बहुदा ती वाचण्यास आपण जास्तीचा वेळ देत नाही. तरीपण, तुमचा दीक्षेबद्दल शिक्षण घेण्याबाबत काही सबंध असल्यास तुम्ही तो एकदा तरी वाचून काढावयास हवा, म्हणजे तुमच्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला कोठे मिळू शकतात ते समजून येईल.

**८.तुम्ही म्हणालात, "काही मुदयांपर्यंत". यावरून सुचित होते की, मोजमाप करण्याकरिता काही यंत्रणा आहे. ती यंत्रणा कोणती?**

दीक्षेकरिता जो अभ्यासक्रम आहे त्यामध्ये खालील बाबींचा समावेश निश्चित असलाच पाहिजे.

अ) विद्यार्थ्यांनी कमितकमी तीन हजार घंटे शिक्षण घेण्यात घालवलेले पाहिजेत.

ब) वेळेचा कमितकमी भाग या चार "सी" (4 Cs) मध्ये म्हणजे (Content) समाधान, (Context) मागचा – पुढचा संदर्भ, (Competency) लायकी आणि (Character) शील – दीलाच पाहीजे.

क) सक्रीय सेवाकार्याच्या अनुभवात प्रामाणीकपणा दाखविला पाहिजे.

ड) सांस्कृतिक दृष्टया योग्य अशा पातळीवर असणे. आणि शिक्षणाबद्दल समाधानी असले पाहिजे.

इ) "परिणामांवर –आधारित–मोजमाप. जे ४ "सी" च्या आधारे घेतलेल्या शिक्षणाचे केलेले मोजमाप. सेवकाने केवळ नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाची पुर्तता केली अथवा प्रश्न–पत्रिकेत दिलेले रकाणे भरले म्हंणून सेवक बनण्याची तयारी झाली असे नाही. भर ज्यावर दिला आहे तो सेवकांच्या गुणांवर, ज्यांनी सर्वांगीन मार्गांनी अभ्यासक्रम पुर्ण केला आहे. "परिंणामावर–आधारीत मोजमाप," यामुळे प्रश्न निर्माण झाला आहे. तो असा उमेदवाराने नेमून दिलेला अभ्यासक्रम पूर्ण केला म्हंणून तो सेवक बनण्यास तयार झाला असे म्हणता येणार नाही. वरिल प्रत्येक मूद्यांवर तपशिलवार माहीती "मूलभूत पुस्तिकेत" दिली आहे.

**९) <u>तर मग, यामुळे प्रांतांनी घ्यावयाची भूमिक किंवा जबाबदारी संपुष्टात आली आहे काय?</u>**

अजिबात नाही. प्रांतिक सेवकीय मंडळ किंवा प्रांतिक अभ्यासक्रम मंडळ, प्रमुखाध्यक्षांना आणि प्रांतिक परिषदेला सेवकाची दीक्षा होण्या अगोदर संभाव्य उमेदवाराने नेमून दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केला आहे असे निश्चितपणे जाहीर करतात. त्यामध्ये काहीही बदल झालेला नाही.

खरे पाहिले असता, प्रामुख्याने वरिल मंडळावर जास्तीची जबाबदारी टाकण्यात आली आहे, ती जबाबदारी म्हणजे, ज्या नविन प्रांतिक परवाणा धारक सेवकांना परवाणे देण्यांत आले आहेत आणि आदर्श असे सेवक तयार करणारे सेवक मंडळ यांना त्यांनी सदबोध करावा, ही ती जबाबदारी आहे.

**१०) <u>मग बदल कशांत झाला आहे?</u>**

पूर्वी, बंधारण पुस्तकात (Manual) अभ्यासक्रमाविषयी नियम घालून दिला होता जो कॅनसास शहरात प्रत्येकांकरिता स्थापित केला गेला होता. प्रत्येक शिक्षण देणाऱ्यांना–महाविद्यालये आणि प्रांत–तो अभ्यासक्रमाविषयीच्या नियम अनुसरणे गरजेचे होते.

आता, प्रत्येक शिक्षण देणारा–महाविद्यालय आणि प्रांत–त्या क्षेत्राच्या गरजेनुसार अधिकाधिक योग्य ठरेल असा अभ्यासक्रम तयार करू शकतात आणि हा तयार केलेला अभ्यासक्रम प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लगार समितीकडून (RCOSAC) मान्यताप्राप्त करून घेऊ शकतात. म्हणून यापूढे कॅनसास शहरात अभ्यासक्रम निश्चित होण्यापेक्षा अभ्यासक्रमातील विषयानुक्रमणिका शिक्षण देणाऱ्यांकडूनच (महाविद्यालये आणि प्रांत किंवा जी महाविद्यालये सल्लामसलत देण्याचे कार्य करतात) येणे गरजेचे आहे.

**११) <u>बंर आम्हाला जे काही पाहीजे त्याचा समावेश अभ्यासक्रमामध्ये आम्ही करू शकतो काय ?</u>**

होय, परंतु जी मर्यादा प्रश्न क्रमांक ८ मध्ये दिली आहे त्यानुसारच.

संपूर्ण मंडळीचा विचार केल्यानंतर आम्हाला असा आत्मविश्वास असला पाहीजे की, ज्या लोकांना तुम्ही सेवाकार्यासाठी शिक्षण देत आहा त्यांची ओळख म्हणजे त्यांचे ईश्वरविज्ञान विषयक ज्ञान आणि दररोजच्या आचरणांत त्यांचे पालन करणे नॅझरीन मंडळीच्या सभासदांसारखे आहे. त्यामुळे कोणत्याही मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाला कमितकमी प्रमाणबध्दता ठेवण्यात आली आहे.

त्यामुळे आम्हाला एखादा असा दीक्षीत झालेला पाहायला पाहीजे जो या भागातील आहे परंतु तोच दुसऱ्या भागात लहानसहान बाबतीत तितक्याच योग्य रितीने तयार झालेल्या दीक्षीताप्रमाणे आहे. प्रत्येक मंडळी किंवा प्रांत "आम्ही जे काही करतो ते आमच्या दृष्टीने योग्य आहे" असे म्हणणाऱ्या स्वतंत्र मंडळयांची मालीका तयार होणार नाही, हा एक प्रकारचा फायदाच म्हणावा लागेल.

**१२. <u>तर,आमच्या प्रांतामध्ये अभ्यासक्रमास मान्यता मिळविण्याकरिता एखादी सोपी सुलभ अशी पध्दत आहे काय?</u>**

थोडक्यात उत्तर असे, 'होय'. दोन मार्गांनी ते करता येणे शक्य आहे,

अ) युरेशिया क्षेत्रात जे शिक्षण देणारे आहेत त्यांच्यातील कोणा एकाला तुमच्यावतीने अभ्यासक्रम पुरविण्याकरिता विचारू शकता परंतु या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रिय अभ्यासक्रम सल्लगार समितीने (ICOSAC) दिलेल्या आवश्यक गोष्टींची पूर्तता झालेली असली पाहिजे. किंवा तुम्ही तुमचा शिक्षण देणारा जो आहे त्याजबरोबर बसून अभ्यासक्रम विकसीत करून घेतला पाहिजे.

ब) तुम्ही तुमच्या प्रांताकरिता अभ्यासक्रम तयार करू शकता आणि तो प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लगार समिती पुढे (RCOSAC) त्यांच्या मान्यतेकरिता ठेऊ शकता.

**१३. <u>अभ्यासक्रम तयार करणे म्हणजे फार मोठे काम आहे. मी तर स्पष्टपणे सांगतो मी स्वतः क्षेत्रीय व्यवस्था पाहणारा अत्यंत कार्यव्यग्र व्यवस्थापक किंवा प्रांताध्यक्ष आहे आणि हया अभ्यासक्रमाची सर्व जुळवाजुळव करण्याकरिता मला वेळ नाही, यासाठी काही मदत उपलब्ध आहे काय?</u>**

होय, अभ्यासक्रम तयार करण्यामध्ये बराच वेळ गुंतवावा लागतो. तरी जर एखादी शिक्षण देणारी संस्था पूर्वीच तयार करून ठेवलेला अभ्यासक्रम तुम्हाला देत असेल तर त्याचा उपयोग करून घेणे चांगले आहे. परंतु जर तुमचा प्रांत किंवा कार्यक्षेत्र विभाग योग्य कारणास्तव स्वतःचा अभ्यासक्रम विकसीत करण्याचा निर्णय घेतो किंवा तशी इच्छा प्रगट करतो तर त्यासाठी लागणारी मदत तुमच्या अगदी हाता जवळ आहे.

एकः सेवाकार्य विकास "मूलभूत पुस्तिका" मध्ये एक भाग आहे, त्यामध्ये अभ्यासक्रम विकसित करण्याकरिता पायरीपायरीने मार्गदर्शन करण्यांत आले आहे.

दोन : नमुनादाखल तयार करण्यांत आलेले अभ्यासक्रम जे पूर्वीच मान्यताप्राप्त झालेले आहेत – असे अनेक अभ्यासक्रम आहेत. नविन अभ्यासक्रम तयार करतांना त्यांना मुळ आधार समजून मदत होऊ शकते. त्या

अभ्यासक्रमाचा आधार घेत योग्य माहितीसह अनुरूप असा अभ्यासक्रम तयार करून त्यांचा उपयोग करू शकता.

तीन : प्रादेशिक शिक्षण देणारे एक–दुसऱ्यांना त्यांचा स्वतःचा अभ्यासक्रम विकसित करून मान्यताप्राप्त करून घेण्यास नेहमी मदत करतात.

चार : हे लक्षात असू द्या की, तुमच्या प्रदेशात तुमची मदत करण्यांस शिक्षण देणारे तयार आहेत, त्याशिवाय तुम्ही, मंडळ अथवा क्षेत्रीय कुशल व्यवस्थापक(FSC) या नात्याने परिस्थीतीनुसार जे काही तुम्हाला योग्य वाटते तेहि ते करण्यास तयार आहेत.

पाच : प्रादेशिक शिक्षण व्यवस्थापक(REC) ही एक व्यक्ति बहुमुल्य साधन असून ती मदत करण्यास तयार आणि योग्यहि आहे.

**१४. <u>आमच्या जवळ मान्यताप्राप्त असा अभ्यासक्रम उपलब्ध आहे. हा अभ्यासक्रम नियमितपणे अनुसरणाऱ्यां करिता चांगला आहे. परंतु जे त्याला अपवाद आहेत त्यांचे काय? उदा. आमच्याजवळ असा एक उमेदवार आहे ज्याने महाविद्यालयातून इश्वरविज्ञान विषयांत पदवी प्राप्त केली आहे, त्या व्यक्तिची आम्ही व्यवस्था कशी लावावी?</u>**

अपवाद नेहमीच आव्हानात्मक असतात. शिक्षण संस्थांना अशा अपवादांना नेहमिच सामोरे जावे लागते. अशा वेळेस शिक्षणाच्या बाबतीत दोन तत्वांचा उपयोग केला जातो – समतोलपणा आणि प्रसंगानुरूपता. पदविधारकाने घेतलेले शिक्षण मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाबरोबर तुलना केल्यास ते कसोटिस उतरते किंवा नाही याबद्यलचा निर्णय प्रांत या नात्याने तुम्हाला घ्यावयाचा आहे.

खरे पाहिले असता, विचार केल्यास हे इतके सोपे नाही कारण इतर संस्थामधून दिलेले नीतिमत्वाबद्यलचे शिक्षण कदाचित आपल्या धार्मिक सांप्रदायाने धर्मशास्त्र विषयातून केलेल्या मार्गदर्श नाबरोबर मिळते –जुळते नसु शकते.

जर तुमच्या प्रदेशातील तुम्हाला शिक्षण देणाऱ्यास विचारपुस केल्यास अशा विशिष्ट प्रकरणांत सल्ला देण्यास तो उत्सूक असेल. तरीसुध्दा त्याचीहि सल्ला घ्यावी किंवा न घ्यावी हे तुम्ही ठरवा.

शेवटी, प्रांतिक मंडळ, प्रमुखाध्यक्षांना (General Superintendent) आणि प्रांतिक परिषदेला (District Assembly) सेवकाची दीक्षा होण्या अगोदर "संभाव्य उमेदवाराने नेमून दिलेला अभ्यासक्रम पुर्ण केला आहे" असे निश्चितपणे जाहिर करते. याला प्रतिसाद म्हणून मंडळी, प्रांतिक अभ्यासक्रम मंडळाने प्रामानिकपणे केलेल्या शिफारशीवर आणि उमेदवारहि प्रामानिकपणे करीत असलेल्या सेवेवर विसंबून राहते.

**१५. <u>जर आमच्या जवळ असा उमेदवार आहे जो पदविधर आहे परंतु कदाचित त्याची पदवी ईश्वरविज्ञान शाखेची नाही, तर तो व्दि–व्यवस्थायिक होईल, असे झाले तर काय होईल? किंवा उदारणार्थ दोन व्यवसायांत गुंतलेल्या उमेदवाराबद्यल काय?</u>**

या क्षेत्रात शिक्षण देणाऱ्यांना अशी जाणीव होत आहे की, भविष्यात सेवकांच्या संखेत भर पडत असलेले सेवक व्दि – व्यवसायिक अथवा दोन व्यवसायात गुंतलेले लोक असतील. अशा परिस्थितीत मंडळीला, व्यक्तिला आणि शिक्षण देणाऱ्यांना हे एक आव्हान ठरणार आहे. परंतु हे लोक अशा गरजांचा निपटारा करण्याकरिता योग्य मार्ग शोधत आहेत.

एकः आज निरनिराळया पर्यायी अभ्यासक्रमाच्या भरपूर जागा उपलब्ध झाल्या आहेत आणि या जागांना सेवकीय अभ्यासक्रमांत अधिक महत्वाचे स्थान राहणार आहे. त्यामुळे योग्य अशा मर्यादेपर्यंतच उमेदवारांची व्यवस्था करता येईल.

दोन : शिक्षण देणारे, इतर धंदे जे उत्तमरितीने चालतात त्यांच्या काळजीपूर्वक शोध घेत आहेत ज्यामुळे पदव्यांचे परिवर्तन विशिष्ठ अशा व्यावसायिक पदविधर अभ्यासक्रमांत करता येईल. उदा. शिक्षक; काही मर्या देपर्यंत वर्गात शिक्षण घेणे आणि व्यवसाय करणे या दोहोंच्या एकीकरणामुळे लायक शिक्षक बणू शकतात. याच प्रकारचे “परिवर्तन” आपल्या पध्दती –अंतरगत होणे शक्य आहे, ज्यामध्ये पूर्वी घेतलेले शिक्षण आणि अनुभव या बाबी पूर्णपणे विचारांत घेवूनच सेवकीय अभ्यासक्रमाच्या ज्या महत्वाच्या बाबी आहेत त्या खात्रीपूर्व क पूर्ण केल्या जातील.

जर तुमच्या जवळ असा उमेदवार आहे जो अशा परिस्थितीत सापडला आहे तेव्हा तुम्ही शिक्षण देणाऱ्यांशी होईल तितक्या लवकर संधी मिळताच संपर्क साधावा आणि पाहा प्रत्येक व्यक्ति वरिल व्यवस्थेत कसा कार्यान्वित होऊ शकतो.

सेवकीय मंडळाला, अशा प्रकारच्या परिस्थितीत दीक्षेच्या संभाव्य उमेदवाराला हेतु पुरस्पर सदुपदेश करण्याची गरज आहे. परंतु मंडळाने अशी समजूत करून घेवू नये की; हा उमेदवार दुय्यम–दर्जाचा म्हणून त्याला कमी सदुपदेशाची गरज आहे; त्यांना कदाचित दुसऱ्या प्रकारच्या उपदेशाची गरज असेल परंतु उपदेशांत कमतरता नको.

**१६. <u>आपले कार्यक्षेत्र वेगाने वाढत आहे. मग आपण पुढारीपण करणाऱ्यांची गरज कशी भागवू शकू?</u>**

अर्थात फार मोठा प्रश्न आहे. “मूलभूत पुस्तिके” ला पुढे असा प्रश्न येणार हे अपेक्षित होते, तरी पण या गरजांची पूर्तता व्हावी म्हाणुन या पुस्तिकेमध्ये संदर्भासहित योग्यरितीचे मार्गदर्शन केले आहे.

प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लागार समितीचा (RCOSAC) मुख्य मुद्या संभाव्य पुढारीपण करण्याबद्दलचा उद्येश या पूर्वी प्रश्न क्रमांक ८ मध्ये दिला आहे. त्या उद्येशाचा हाच अर्थ आहे की संभाव्य पुढारीपण करणाऱ्यांची पूर्तता तुम्ही कशी कराल. याचा उल्लेख तुमच्या विशिष्ट संदर्भात दिला आहे.

तुमची मागणी, तुमच्या संदर्भ–प्रात्याक्षिकरणाच्या पायावर आणि मागणिच्या योग्यतेवर उभारली गेली आहे. अर्थात यासाठी पुरावे देण्याकरिता बरेचसे कष्ट करावे लागतात परंतु तुमच्या स्वतःच्या सेवाकार्याकरिता आणि अभ्यासक्रम विकसित करण्याकरिता हे करणे महत्वाचे आहे.

अशा प्रकारच्या अडचणींचा सामना करण्यास मंडळीला आवडते—हे मंडळीचे जिवंतपणाचे लक्षण आहे. शिक्षण देणारे आणि प्रादेशिकअभ्यासक्रम सल्लागार समिती (RCOSAC) अशा प्रकारच्या अडचणींवर नेहमीच उत्तम सर्जनशील उत्तरे शोधत असतात. विश्वासुपणे शिक्षण देणारे अशा अडचणींवर उत्तरे शोधण्यास पुढाऱ्यांसोबत नेहमी नेटाने काम करतात.

**१७. <u>आमचे काही उमेदवार आहेत ते अंतरराष्ट्रिय अभ्यासक्रम सल्लागार समितीच्या (ICOSAC) मार्फत अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत, हया अभ्यासक्रमाला त्या क्षेत्रातील शिक्षण देणाऱ्यांनी मान्यता दिलेली आहे. अशा लोकांबरोबर आपण कसे वागले पाहिजे?</u>**

याकरिता सर्वात उत्तम कृति म्हणजे उमेदवार ज्या मार्गाने अभ्यासक्रम करण्यास गेला आहे त्याची प्रथम मान्यता देणे आवश्यकआहे म्हणजे त्याने अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर कोणताहि प्रश्न उपस्थित होणार नाही.

उमेदवाराची दीक्षा होण्याचे दोन मार्ग आहेत.

पहीला : जर उमेदवार युरेशिया प्रदेशाशिवाय इतर प्रदेशाचा सभासद आहे तर ज्या प्रदेशाने या अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, त्याच प्रदेशांत तिचा किंवा त्याची दीक्षा झाली पाहिजे. त्यानंतरच त्याच्या दीक्षापत्रांना आपल्या प्रदेशात मान्यता द्यावी.

दुसरा : जर उमेदवार आपल्या क्षेत्रातील अनेकप्रांतापैकी एका प्रांताचा सभासद असेल तर त्याने पूर्ण केलेला अभ्यासक्रम तुमच्या स्वतःच्या प्रांताने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमा बरोबरीचा आहे किंवा नाही हे सेवकीय मंडळाने पाहण्याची गरज आहे. कारण तुमचा अभ्यासक्रम जो तयार करण्यांत आला आहे तो तुमच्या संदर्भा स्थित आहे, कदाचित असे होऊ शकतेकी, तुम्ही मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमात अशा काही बाबींचा उल्लेख केला असेल जो अभ्यास हया उमेदवाराने केलेला नाही.

असे अनेकव्यवसाय आहेत, ज्या लोकांनी इतर देशांत त्या व्यवसायाचे शिक्षण घेतलेले असते परंतु ज्या देशांत त्यांना सेवा करायची आहे त्या देशांनी मांडलेल्या अपेक्षांची पूर्ती त्यांना करावीच लागते. म्हणून सेवकीय उमेदवारांनी अशा अपेक्षा केल्याचे आश्चर्य मानू नये.

प्रांतिकमंडळाने किंवा त्या तोडीचे दुसरे जे मंडळ असेल त्यांनी तुमच्या अभ्यासक्रमाचा आधार घेवून तुम्हाला प्रत्येकउमेदवाराबद्यलचा निर्णय घेणे गरजेचे राहिल.

## सेवकीय मंडळा सोबत काम करणे उत्तम सरावाकरिता मांडलेले विचार

शिक्षण देणाऱ्या संस्था आणि सेवकीय मंडळे यांचे संबंध म्हणजे “काम प्रगतिपथावर” : हे संबंध काही वेळेस अतिउत्तम, काही वेळेला आव्हानात्मकआणि काही वेळेस निराशाजनकअसू शकतात. खाली दिलेल्या टिपणी केवळ पध्दतींवर विचार करण्याकरिता दिल्या आहेत ज्यामुळे काही प्रसंगी हया टिपणी आपल्या क्षेत्रीय भागात चांगल्या कामाला येवू शकतात. कोणत्याही दोन प्रांतात एकाच पध्दतीचा नमुना सारखा असु शकणार नाहीः मंडळे आणि संस्था निरनिराळया पध्दतींनी चालविल्या जातात आणि अर्थात कार्यक्षमतेमध्ये निरनिराळया पातळीवरहि असू शकतात.!

१. शैक्षणिकसंस्था, सेवकीय मंडळाच्या चिटणिसाला “सल्लादेणारी सेवा संस्था” या नात्याने पुढे येते तेव्हा ती कृती महत्वाची ठरते. जेव्हा नवे उमेदवार येवू लागतात (विशेषकरून जर ते जगाच्या इतर भागामधुन येतात, किंवा इतर पारंपारिक रूढींमधून येतात) तेव्हा ते निश्चितपणे शिक्षण घेतलेले असतात आणि सेवकीय मंडळला त्यांनी पूर्वी केलेला अभ्यास आणि “पूर्वानुभव आधारित शिक्षण मुल्यांकन” (ADEL) ने उमेदवाराचे केलेले मुल्यांकन पुढील शिक्षणाला जाण्याकरिता पुरेसा आहे.

२. उमेदवाराने इतर संस्थांमधून अथवा इतर कोणत्याही अन्य मार्गांनी अभ्यासक्रम पूर्ण केला असेल आणि संस्था, उमेदवाराच्या विद्यालयीन शिक्षणाची नोंदणी करण्याकरिता स्वतःला सादर करते तेव्हा ती बाब संस्थेकरिता उपयोगी ठरते. शैक्षणिकसंस्थांना हे काम करण्याचा यथायोग्य आणि विश्वासुपणे करण्याचा अनुभव असतो.

३. उमेदवार आपल्या अभ्यासात कसा प्रगती करीत आहे याबद्दल सेवकीय मंडळाला वार्षिकअहवाल देणे महत्वाचे आहे. त्याने कोणता अभ्यासक्रम नुकताच पुर्ण केला आहे, कोणता अभ्यास अद्याप पूर्ण करायचा राहिला आहे, आणि कोणता अभ्यास पूर्ण करण्यास तो असफल ठरला आहे, अशा प्रकारचे दर वर्षी तयार केलेले दस्ताऐवज ज्यामध्ये उमेदवाराची असलेली माहिती आहे, ती उपयुक्त ठरते.

४.जेव्हा शैक्षणिकसंस्था सेवकीय मंडळाला उमेदवाराबद्दल माहिती सादर करते, त्याची एकप्रत उमेदवारांना सुध्दा देणे महत्वाचे आहे. त्यामुळे उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिकदर्जाची जाणीव राहते जी शैक्षणीकसंस्थांनी सेवकीय मंडळाला दिलेली असते. याचाच अर्थ असा होतो की, उमेदवाराला त्याच्या अभ्यासाबद्दल माहिती असते आणि तो शिक्षणाबद्दल अधिकजबाबदार ठरतो.

५. सेवकीय मंडळाच्या चिटणिसांजवळ निश्चितपणे उमेदवारांकरिता तयार करण्यात आलेली “अभ्यास योजना” प्रति महत्वाच्या आहेत. त्यामुळे चिटणिस उमेदवारांना त्यांच्या प्रगतीबद्दल सल्ला देऊ शकतात तसेच सेवकीय मंडळाच्या सभासदांना देखील योजना तयार करणारे कसे काम करतात याची खात्री होते.

६. शैक्षणिक संस्था सेवकीय मंडळाशी सल्लामसलत करतात ही बाब ओळखून घेणे हेहि महत्वाचे असते. कदाचित संस्थांनी दिलेला सल्ला सेवकीय मंडळ नेहमीच मान्य करणार नाहीत तरी पण सेवकीय मंडळासोबत संभाषण करण्याचे सर्व मार्ग मोकळे असणे गरजेचे आहे.

७. परिचयात्मक अभ्यासक्रम आणि सेवा धंद्यामध्ये वाढ होणे या कामी संस्थांनी सेवकीय मंडळासोबत काम केले पाहिजे ज्यामध्ये “मूलभूत पुस्तिका” चा परिचयात्मक अभ्यास, दीक्षित होण्याकरिता लागणाऱ्या आवश्यक बाबी आणि सेवा करणाऱ्यांचा नियमित सेवा धंद्याचा विकास यांची पूर्तता कशी होईल, या बाबींचा त्यांत समावेश आहे.

८. शैक्षणिक संस्थांनी सेवकीय मंडळास सेवकांना सातत्याने शिक्षण देण्यास आणि सकारात्मक हातभार लावण्यास सेवा उपलब्ध करून दिलीच पाहिजे.

९. शैक्षणिक संस्थांनी, त्यांच्या सेवकीय मंडळासोबत निरनिराळया अभ्यासक्रम योजनेत आर्थिक गुंतवणूक होत असतांना तारतम्य ठेवले पाहिजे आणि खालील बाबींना मान्यता दिली पाहिजे.

(अ) शिक्षण देण्यास करावी लागणारी वास्तवीक आर्थिक किंमत आणि

(ब) प्रांतिक क्षेत्रीय आणि सस्थांना कराव्या लागणाऱ्या आर्थिक मदतीवर नियंत्रण.

“स्वतः उपस्थित असणे” याला दुसरा पर्याय नसतो. सभासदांकरिता शैक्षणिक संस्थांमध्ये योग्य जागा शोधून काढणे आणि त्यांना सेवकीय मंडळाच्या सभासदांबरोबर कामावर लावणे या गोष्टी महत्वाच्या आहेत.

नैतिकताः समाजाला शक्य असलेल्या सर्व मार्गांनी शिक्षित करणे महत्वाचे आहे, आणि प्रांताबरोबर संबंध स्थापित करणे ज्यामुळे सेवकीय मंडळाला शैक्षणिक संस्थांबद्दल ती संस्था अलग नसून आपल्याच संस्थेचा ती एक भाग आहे असे वाटू लागेल.

## निवेदन पोहंचविण्याचे मार्ग

## प्रांतिक सेवकीय मंडळास दिलेले अधिकार

निवेदन पोहंचविण्याचे निरनिराळे मार्ग जबाबदारीची क्षेत्रे, याबद्दल संक्षिप्त अवलोकन खाली दिले आहेत जे दोन भागांत विभागले आहेत, याबद्दलची माहिती :

भाग अ : या भागांत सेवाकार्य करणाऱ्या उमेदवारांची निवड आणि स्थानिक व प्रांतिक स्तरावर देण्यांत आलेली सनद व सनदेचे नुतनीकरण, जे पुढे उमेदवाराला "दिक्षेस पात्र" या स्तरावर नेऊन पोहंचविते, या संबंधी उमेदवाराच्या जबाबदाऱ्यांची रूपरेषा दिलेली आहे.

भाग ब : या भागात सेवकांचे शिक्षण आणि प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB) जे मंडळ युरेशिया प्रदेशातील शैक्षणिक संस्थांबरोबर सहकार्यान्वयीत आहे, त्यांच्या जबाबदाऱ्यांविषयी माहिती दिली आहे.

कंसात दाखविलेले सर्व संदर्भ २००९–२०१३ बंधारण पुस्तकातील (Manual) परिच्छेद आहेत. या दस्तऐवजात प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळ (DMCB) आणि प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB), ही मंडळे एकमेकांपासून भीन्न अशी समजली जातात परंतु बंधारण पुस्तकांत अशी तरतूद केलेली आहे की ही दोनीहि मंडळे एकाच प्रांतिक सेवकीय मंडळीत एकत्रीत अशी करता येतात. (२०३. १७).

### अ. उमेदवारांची सेवाकार्यासाठी निवड आणि शिफारस :

#### स्थानिक सेवक

स्थानिक मंडळीमध्ये सेवकीय उमेदवारांची निवड त्यांना देण्यांत येणारी शिफारस, यामध्ये पाळक आणि पंचमंडळ यांच्या वेगवेगळया जबाबदाऱ्या आहेत.

**पाळक....**

- व्यक्तिंच्या ठायी असलेली दाने आणि हुशारी ओळखणे आणि त्यांना स्थानिक मंडळीत सामिल करून घेणे, अशा लोकांना ख्रिस्ती सेवेत यावेसे वाटल्यास त्याप्रमाणे त्यांना शिक्षण देणे, उपदेश करणे आणि सेवेकरिता तयारी करीत असतांना त्यांना योग्य मार्गदर्शन करणे. (४१३.१०)

- पंचमंडळाला, उमेदवार जे स्थानिक अथवा सामान्य सेवक म्हणून सेवा करीत आहे त्यांना परवाना देण्याबाबत अथवा परवाण्याचे नुतनीकरण करण्याबाबत शिफारस करेल (१२९.१२). जर पाळक दीक्षीत सेवक नसेल तर त्याने/तिने केलेल्या शिफारशीस प्रांताध्यक्षांची मान्यता प्राप्त होणे आवश्यक आहे. (४२८.१)

**स्थानिक पंचमंडळ...**

- उमेदवाराला, त्याला/तिला वैयक्तिक तारणाचा अनुभव, पवित्र शास्त्राचे, सिद्धांताचे आणि मंडळीच्या व्यवस्थितपणा यांचे ज्ञान आहे किंवा नाही याची परिक्षा करते. (४२८.१)
- उमेदवाराचे, प्रात्याक्षिक चांगले आहे, तो व्यवसायिक आहे आणि सेवकाच्या ठायी आवश्यक असलेल्या दानांचा विकास होत आहे ज्याची उपयुक्तता आहे अशा स्थानिक अथवा सामान्य सेवकाला एक वर्षाचा परवाणा देते. (४२८, ४२८.१)

स्थानिक मंडळीचा परवाणा मिळाल्यानंतर प्रथम उमेदवाराने प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाशी (DMSB) संपर्क साधावा आणि मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाकरिता स्वतःची नोंदणी करून घ्यावी.

स्थानिक सेवकीय परवाण्याचे नुतनीकरण करावयाचे झाल्यास वर निर्देशिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा, स्थानिक सेवक, ठरवून दिलेला अभ्यासक्रम प्रांतिक अभ्यासक्रम मंडळाच्या निर्देशानुसार पुढे चालू ठेवतो आणि स्थानिक सेवकाला परवाण्याचे नुतनीकरण करून घ्यावयाचे झाल्यास त्याने पाळकाच्या शिफारशीने पंचमंडळाला तशी विनंती करावी. (४२८.४)

**प्रांतिक परवानाधारक सेवक...**

जेव्हा स्थानिक सेवक प्रांतिक परवाणाकरिता अर्ज करतो तेव्हा पंचमंडळ त्या उमेदवाराची शिफारस प्रांतिक सेवकीय परावाणा मंडळाला (DMCB) करते आणि हे मंडळ उमेदवाराची परिक्षा घेतल्यानंतर त्याला प्रांतिक परवाणा मिळावा अशी सुचना प्रांतिक परिषदेमध्ये मांडते.

**स्थानिक पंचमंडळ ...**

- स्थानिक सेवकाने कमित कमी पूर्ण एक वर्ष सेवा केली असल्यास आणि नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाचा १/४ इतका भाग अभ्यासक्रम पूर्ण केला असल्यास स्थानिक पंचमंडळ प्रांतिक

सेवकीय परवाणा मंडळाला (DMCB) त्या सेवकाला प्रांतिक सेवक परवाणा मिळावा म्हणून शिफारस करते. (४२८.५,४२९.१)

❖ युरेशिया क्षेत्रातील अभ्यासक्रम तीन वर्षे पूर्ण वेळ केलेल्या अभ्यासक्रमाच्या बरोबरीचा आहे; म्हणून ज्या उमेदवाराला त्याला/तिला पहिला प्रांतिक परवाणा मिळण्याकरिता शिफारस द्यायची आहे त्यांच्याकरिता त्यांना अभ्यासाचे पूर्ण केलेले १००० तास उद्दिष्ट गाठण्यास योग्य आहेत (क्षेत्रीय "मूलभूत पुस्तिका" पाहा)

**प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळ ...**

- प्रांतिक सेवकीय परवाणा मिळविण्याकरिता स्थानिक पंचमंडळाने ज्या उमेदवारांची शिफारस केली आहे त्यांची परिक्षा घेते. हे मंडळ प्रत्येक उमेदवाराची काळजी पूर्वक चौकशी करते आणि इतर कोणत्याही प्रकारची योग्य अशी वाटणारी चौकशी तीही करते. जसे त्याचा /तिचा वैयक्तिक तारणाचा अनुभव, पवित्र आत्म्याच्या बापतिस्म्याने त्याला /तिला आलेला संपूर्ण पवित्रीकरणाचा अनूभव, पवित्र शास्त्रातील विश्वास —सिद्धांताचे ज्ञान; सर्व विश्वास—सिद्धांतांचा पूर्णपणे स्विकार; ख्रिस्ती पणास शोभेल असे चारित्र्य आणि वागणूक या संबंधी केलेला करार; मंडळीची शासन पद्धत; कृपादानांचे पुरावे, दानं, बौद्धिक, नैतिक आणि आध्यात्मिक गुणवत्ता आणि ज्या सेवेसाठी पाचारण झाले आहे त्या सेवेस लागणारी शारीरिक क्षमता. (२२८.२—३)
- उमेदवारांची प्रांतिक परवाणे मिळावे म्हणून प्रांतिक परिषदेला शिफारस करणे. (२०३.४)

**प्रांतिक परिषद ...**

- अनुकुल अशा शिफारशी सेवकीय परवाणा मंडळाकडून आल्या असतांना प्रांतिक परवाणे देते. (२०३.४)

  प्रांतिक परवाण्याचे नुतनीकरण करावयाचे झाल्यास वर निर्देशिलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करावा; प्रांतिक परवाणाधारक सेवक, पाळकाने केलेल्या सुचनेच्या आधारे आणि पंचमंडळाने केलेल्या शिफारशीवरून, आणि त्याने/तिने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमा पैकी कमित कमी दोन अभ्यासक्रम पूर्ण केले असल्यास, प्रांतिक परिषदेला प्रांतिक परवाण्याचे नुतनीकरण करण्याकरिता विनंती करू शकतो(४२९.३) मंडळाने उमेदवाराचे मुल्यमापन केल्यानंतर प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ (DMCB) नुतनीकरणाबद्दल प्रांतिक परिषदेला शिफारीश करेल. परवाणा मिळालेला सेवक जेव्हा पाळकीय सेवा करीत आहे तेव्हा त्याच्या परवाण्याचे नुतनीकरण करण्याबद्दल प्रांतिक सल्लागार मंडळ शिफारीश करेल. (४२९.५)

**दीक्षा**

प्रांतिक परवाणा मिळालेल्या सेवकाने, त्याला पहिल्यांदाच मिळालेल्या परवाण्या नंतर मान्यताप्राप्त अभासक्रम १० वर्षात पुर्ण केला असल्यास (४२९.४) आणि ज्याने तीन वर्षे सेवेत खंड न पडू देता पूर्णवेळ सेवक म्हणुन सेवा केली असेल (४३०.३,४३१.३) तो उमेदवार दीक्षेकरिता पात्र ठरू शकेल.

खाली दिलेली कार्यपद्धत पूर्वी सारखीच आहेः

**प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB)...**

- हे मंडळ उमेदवाराने पूर्ण केलेला मान्यताप्राप्त अभ्यासक्रमाचे मुल्यमापन करते आणि
- हे मंडळ उमेदवाराने पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमावरून त्याला पदविदान करण्यांत यावे अशी शिफारस प्रांतिक परिषदेला करते.

**प्रांतिक सेवकीय परवाना मंडळ (DMCB)...**

- हे मंडळ दीक्षित वर्ग अथवा सेवकवर्ग ज्यांना दीक्षेकरिता सादर करण्यांत आले आहे त्यांची परिक्षा घेते आणि मुल्यमापन करते
- या प्रकरणाच्या शेवटी दिलेली पुरवणी पाहा, त्यातील "उमेदवाराची छाननी आणि त्यांना विचारण्यात येणारे प्रश्न" हे प्रकरण पाहा. प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळाने उमेदवाराची मुलाखत घेणे आणि त्यातून काही "आधारभूत निर्मिती" याबद्दल विचारण्यांत येणारे योग्य असे प्रश्न दिलेले आहेत. हा केवळ नमूना दिलेला आहे.

**प्रांतिक परिषद ...**

- ही परिषद, दीक्षितवर्ग अथवा सेवकवर्ग ज्यांनी दीक्षेकरिता अवश्यक अशा सर्व बाबींची पूर्तता केली असेल आणि सेवकीय परवाणा मंडळाने त्यांच्याबद्दल अनुकुल अशी शिफारस केली असेल त्यांची दीक्षेकरिता निवड करते : (२०३.६,४३०.३,४३१.३)

**प्रमुखाध्यक्ष...** ज्यांच्या अमलाखाली आपण आहोत

- प्रमुखाध्यक्ष इतर दीक्षित सेवकांनसोबत उमेदवाराच्या मस्तकावर हात ठेवून आणि योग्य धार्मिक विधीनुसार, त्यांची दीक्षा करतात. (३०७.३,४३३.५)
- दीक्षा झाली आहे अशा व्यक्तिला दीक्षा प्रमाणपत्र देतात. (४३०.१,४३३.६)

**ब. सेवकांचे शिक्षण**

प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB) अधिकृत मान्यताप्राप्त नॅझरीन संस्थेच्या सहकार्याने प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लागार समितीच्या (RCOSAC) मार्फत, सेवकांना शिक्षण देण्याकरिता जबाबदार राहिल. (२३१.४) शिक्षण देणाऱ्या संस्था आणि प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ यांनी प्रत्येकांच्या वेगवेगळया जबाबदाऱ्या असतांना लक्षपूर्वक एकत्रीत येवून काम करणाची गरज आहे.

**स्थानिक सनदी सेवक...**

- प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB) च्या मार्गदर्शना खाली नेमून दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्याची जबाबदारी स्थानिक सनदी सेवकाची आहे. (४२८.४) सर्व साधारण अपेक्षा ही आहे की, प्रत्येक विद्यार्थ्याने जगाच्या ज्या क्षेत्रांत त्याच्या–तिच्या मंडळीने योग्य असा नेमून दिलेला अभ्यासक्रम पुरविण्याची तरतूद केली आहे त्याचा फायदा त्याने घ्यावा. (४२६.१)

**नेमून दिलेला अभ्यासक्रम...**

- शिक्षण देणाऱ्या एका संस्थेने अभ्यासक्रम विकसीत केला आहे. (४२६.१) युरेशिया क्षेत्रामध्ये नेमून दिलेले चार अभ्यासक्रम सुद्धा प्रचलीत आहेत, हे चार अभ्यासक्रम चार संस्थांनी पुरविण्याची व्यवस्था केली आहे, त्या चार संस्था अशाः इस्टर्न मेडिटेरियन नॅझरीन बायबल कॉलेज (EMNBC); युरोपियन नॅझरीन कॉलेज (EuNC); नॅझरीन थिओलॉजिकल कॉलेज मॅनचेस्टर (NTC); आणि साऊथ आशिया नॅझरीन बायबल कॉलेज (SANBC)

**प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB)**

- प्रत्येक विद्यार्थ्याचे त्याचे/तिचे त्यांना नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रगतीचे मुल्यमापन करते आणि त्या विद्यार्थ्याला कोणत्या ठिकाणी ठेवता येईल ते निश्चित करते. (४२६)

- जे विद्यार्थी नॅझरीन शिक्षण संस्थेने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाकरिता आपली नांवे दाखल करतात त्यांना उत्तेजन देणे, आर्थिक मदत करणे आणि मार्गदार्शन करणे यासाठी मार्ग शोधतात. (२३०.६).
- नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाकरिता ज्या उमेदवारांनी आपली नांवे दाखल केली आहेत त्या सर्वा ंच्या घडामोडिवर देखरेखीचे काम करते. (२३०.२)
- नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाची वार्षिक परिक्षा घेते आणि विद्यार्थ्यांना पुढे सरकवते. (२३०.१)
- विद्यार्थ्यांना नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रगतीची नोंद योग्य रितीने ठेवते. (२३०.४)
- प्रत्येक विद्यार्थ्यासंबंधीचे संपूर्ण शैक्षणिक प्रगतीचा वार्षिक अहवाल प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळाला देते. (२३१.३)
- नेमून दिलेल्या अभ्यासक्रमांत विद्यार्थ्याने केलेली प्रगती आणि कामाच्या योग्य ठिकाणी त्याची नेमणूक करण्याबाबत शिफारस प्रांतिक परिषदेला दर वर्षी करते. (२३१.३)

वरील जबाबदाऱ्यांची पूर्तता करण्याकरिता, प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाने (DMSB) शिक्षण पुरविणाऱ्या संस्थाबरोबर परस्पर सहकार्याने काम करणे गरजेचे आहे. खाली दिलेल्या शिफारशी, युरेशिया क्षेत्रातील प्रांतामध्ये जी चार महाविद्यालये आहेत त्यांच्या सर्वात उत्तम अशा कृतीवर आधारीत आहेत.

- जेव्हा विद्यार्थी शिक्षण संस्थेला अर्ज करितो, तेव्हा पाळकीय अभिप्रायपत्र विद्यार्थ्याच्या पाळकाकडून अथवा प्रांताध्यक्षांचे असणे आवश्यक आहे.
- विद्यार्थ्याबरोबर करार केलेला असेल की, शैक्षणिक संस्था त्याचा वार्षिक प्रगती अहवाल प्रांतिक सेवकीय अभ्यास मंडळाकडे (DMSB) पाठविल (म्हणजे प्रगती–अहवालची प्रत अथवा त्याच्या काही भागाची नक्कल.)
- शक्य झाल्यास विद्यार्थ्यांबरोबर शाळेच्या आणि प्रांताच्या प्रतिनिधीबरोबर (प्रांताचा प्रतिनिधी म्हणजे प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाचा एक सभासद) वार्षिक स्तरावर भेटीची व्यवस्था करावी.
- विद्यालयीन प्रमुखाला प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाच्या वार्षिक सभेत येण्याचे आमंत्रण द्यावे जेथे सेवकीय विद्यार्थ्याला नेमून दिलेल्या कार्यक्रमाबद्दलचा प्रगती–अहवाल सादर केला जाईल.

- जेव्हा नॅझरीनेतर शैक्षणिक संस्थेकडून विद्यार्थ्याच्या प्रगती अहवालाचे मुल्याांकन केले जाते तेव्हा शाळेच्या प्रमुखाचा सल्ला घेवू शकता; किंवा जेव्हा विद्यार्थी दुसऱ्या प्रांतातून नेमलेला अभ्यासक्रम करून आलेला असेल तेव्हा त्या प्रांताच्या प्रमुखाची सल्ला घेऊ शकता. शिक्षण प्रमुखांनी केलेले मुल्यांकन–अहवाल मंडळाकरिता शिफारस असेल, जे मंडळ शेवटचा अंतिम निर्णय घेतात.

## परस्परांच्या मार्गदर्शनाबद्दलची –पुरवणी

## प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळ (DBMC)

काही वेळा जी व्यक्ति दीक्षा घेण्याच्या प्रयत्नात असते त्याला विचारण्यांत येणारे प्रश्न शोधण्याच्या प्रयत्नात असतांना प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळाला (DBMC) नुकसान पोहंचू शकते. सत्य हे आहे की; उमेदवाराला विचारण्यात येणारे काही प्रश्न पूर्वतः वैयक्तिक असतात आणि एखाद्याच्या वैयक्तिक आणि आध्यात्मिक जीवनांत शिरून विचारण्यांत येणाऱ्या प्रश्नाबद्दल परिक्षकाला संकोच वाटतो. या कारणास्तव, महत्वाची बाब ही आहे की; उमेदवारांच्या पहिल्याच मुलाखतीपासून त्यांना असेवाटले पाहिजे की; ते परिक्षकांच्या सोबत नाहीत परंतु ते मित्रांसोबत आहेत. मंडळाचा पूर्णतः उद्देश हा असावा की; उमेदवारांनी त्यांना देवाने केलेल्या पाचारणाशी विश्वासु राहावे, यासाठी त्यांना उत्तेजना द्यावे, त्याचवेळेस त्याच्या/तिच्या जीवनाला असा आकार द्यावा की तो/ती ख्रिस्ताच्या ठायी असतील.

उमेदवाराला कठीण प्रश्न विचारले असतांना सुध्दा जर ते प्रीतिच्या आणि प्रामाणिकपणाच्या वातावरणांत विचारले गेले तर वैयक्तिक प्रश्न विचारणे सोपे होवून जाते. मंडळाने हे लक्षात ठेवण्याची गरज आहे की; उमेदवारांची मुलाखात घेणे हा त्याकरिता एक अव्दितीय प्रसंग आहे, याच वेळेस उमेदवारांबरोबर प्रीतिचे आणि विश्वासाचे संबंध स्थापित करता येतात, आणि त्यांच्या मनांत असलेले सुप्त विचार, मनांत चालू असलेला झगडा आणि त्यांची स्वप्ने यापर्यंत तुम्ही पोहोंचू शकता. (हया अशा गोष्टी आहेत ज्या त्यांची दीक्षा होण्या अगोदर निश्चिंत तुम्हाला माहित असाव्यांत).

तर मग, उमेदवाराची मुलाखत घेत असतांना अशा कोणत्या सूचक गोष्टी आहेत ज्यांचा सेवकीय परवाणा मंडळाने (DBMC) शोध घेतला पाहिजे?

युरेशिया प्रदेशांत असलेल्या "मूलभूत पुस्तिकानुसार" नॅझरीन मंडळीच्या सेवेत" अस्तीत्वात असणे (To Be); "जाणता असणे" (To Know). आणि "कृती करणे" (doing) यांचे संतुलित मिश्रण

असावे (४३६.६). युरेशिया प्रदेशांत “मूलभूत पुस्तिकेनुसार” नॅझरीन मंडळीच्या सेवेत “अस्तीत्वात असणे; “जाणता असणे” आणि “कृती करणे” यांचे संतुलीत मिश्रण आहे. “मूलभूत पुस्तिका” या तीन घटकांचा विस्ताराणे शोध घेते. ते खालील प्रमाणेः

**सेवकांकरिता “अस्तीत्वात असणे” याचे इच्छित परिणाम खालीलप्रमाणेः**

- शास्त्रवचनांत ख्रिस्तासारखे असणे असे आज्ञापिले आहे, तू देवावर पूर्ण मनाने, पूर्ण जिवाने, पूर्ण शक्तिने व पूर्ण बुध्दिने प्रीती कर.
- देवाने केलेल्या पाचारणांत सखोल धर्मनिष्ठेने वास करणे
- विश्वासणाऱ्यांच्या समुहाशी अस्तीत्वात असलेली व्यक्ति या नात्याने वाटणे.
- निर्विवाद प्रामाणिकपणा आणि प्रतिष्ठा
- कळवळा, सोशिकपणा आणि चिकाटी
- स्वतःची वर्तणूकआणि आत्मसंयम
- नम्रता, सौम्यता आणि इतरांबद्दल संवेदनशीलता
- प्रेम आणि धैर्य
- शहाणपण आणि योग्य ते निवडण्याचे ज्ञान
- दूरदृष्टी आणि समर्पण

**सेवकाकरिता “जाणता असणे” याचे इच्छित परिणाम खालील प्रमाणेः**

- पवित्र शास्त्राचे आणि त्याचा अर्थ लावण्याचे संपूर्ण ज्ञान
- स्पष्ट अशी ख्रिस्ती—ईश्वरविज्ञानाची जाणीव, विशेष करून त्यामध्ये ख्रिस्ताच्या पवित्रतेची जाणीव.
- ख्रिस्ती मंडळाच्या इतिहासाची पक्की आणि शतकानुवर्षे करीत असलेली विशेष सेवा यांची पक्की माहिती.
- वेस्लीने दिलेले ईश्वरीविज्ञान, त्याचा वारसा आणि परंपरा याची माहिती
- दररोजच्या जिवनांत दिसणारी आध्यात्मिकनियमीतता

- विश्वासणाऱ्यांच्या समुहांत खिस्ती आराधनाचे महत्व, पध्दती आणि ठीकाण याबद्दलची माहिती
- खिस्ती व्यक्तिगत आणि सामाजिक नीतितत्वे यांची निच्छित माहिती.
- आपले विचार इतरांना सांगण्याबद्दलचे सिध्दांत आणि बोलण्याची कला. विशेषतः देवाचे वचन सांगणे ज्यामध्ये शिक्षण देणे आणि इतरांबरोबर संभाषण करण्याची कला यांचे ज्ञान असणे.
- खिस्तासारखे चाकर होवून पुढारीपण करणे, स्थानिक मंडळीचे व्यवस्थापन करणे, संस्थेचे आणि सेवेचे आदर्श नमुने असणे अशा प्रेरणादायी शक्तिंची स्पष्ट समज असावी, तरीपण ज्या पुढारीपणांत आणि अनुशासनांत ऐहिकपणा आहे त्यापासुन भीन्न असावे याचीहि समज असावी.
- तुटफुट झालेली मानवाची अवस्था दोनीहि व्यक्तिची आणि समाजाची यांची माहिती असली पाहिजे.
- मानवी जीवन आणि स्थानिक मंडळीत आणि समाजांत असलेले गट ज्यामध्ये विवाह आणि कुटुंब यांचा समावेश आहे यांच्यात प्रेरणा देणारे सामर्थ्य आहे याची जाणीव असावी.
- मानवाच्या इतिहासात आणि संस्कृति यामधली अंतर, विशेषकरून सेवकांच्या स्वतःच्या संदर्भात यांचा अर्थ समजून घेणे.
- संस्कृतिचा झुकण्याचा कल आणि त्याचा त्यांच काळांत समाजावर झालेले परिणाम ज्यामध्ये धर्म विषयाचे अनेकतत्ववादाचा समावेश आहे याची जाणीव असावी.
- संघटीत समाजाच्या कृति आणि नासोरी मंडळीचे आचरणकृति यांची माहिती असावी.
- समाजात असलेले कायदेकानून ज्यामध्ये मंडळी कार्यरत आहे याची जाणीव असावी.

**सेवककरिता "कृति करणे" याचे इच्छित परिणाम खालील प्रमाणेः**

- नमुनेदार दैवी—जीवन आणि आवश्यक असलेली धार्मिकता
- उमेदवाराचा वैयक्तिक विकास, कौटुंबिक विकास आणि मंडळीचा विकास याबद्दल प्रार्थनापूर्वक विचार करणे.
- प्रामाणिकपणे आणि एक दुसऱ्यांबरोबर सन्मानपूर्वक काम करणे.
- देवाच्या प्रीतीत इतरांना प्रतिसाद देणे.
- देवाच्या लोकांना उपासनेमध्ये, विशेषकामामध्ये आणि सेवा करण्यामध्ये पुढारीपण करणे.
- सेवाकार्याकरिता संतांना सुसज्ज करा.
- स्पष्टपणे आणि संस्कृतिचे भान ठेवून योग्य पध्दतीने देवाच्या वचनाव्दारे प्रवचन करणे.

- बोलण्याव्दारे आणि कित्ता बनून शिक्षण देणे.
- हरवलेल्यांना सुवार्ता सांगणे
- कळपाला चारणे.
- मंडळीच्या आणि समाजाच्या सेवेबद्दल स्पष्टपणे बोलणे.
- व्यक्तिंची आणि समाजाची झालेली तुटफूट, यांची सेवा करणे
- जे सत्य ते प्रीतीने सांगणे
- काळजीपूर्वक आणि बिनशर्तपणे ऐकून घेणे
- स्थानिक पातळीवर असलेल्या देवाच्या सर्व लोकांना सेवेमध्ये मदत करणे.
- गरजेनुसार आणि योग्यवेळी स्थानिक मंडळीला संघटित करणे
- कार्यक्रमाचे आणि योजनांच्या परिणामांचे मुल्यमापन करणे.
- सेवेकरिता आणि विशेष सेवेकरिता आवश्यक लागणारी माहिती देण्याचे तंत्रज्ञान आणि इतर माध्यमांचे कसब साधून घेणे.
- आयुष्यभर पुरणाऱ्या शिक्षणाचा पिच्छा पुरवणे.

तर मग, आता उमेदवारांची छाणनी करण्याची जबाबदारी सेवकीय परवाणा मंडळीची आहे, आणि ही छाणनी वर नमूद केलेल्या परिणामांचा विचार करून केल्या जाईल, त्यामुळे उमेदवाराला लागणाऱ्या आवश्यक कलांचा, ज्ञानाचा आणि त्यांच्याठायी असलेल्या विशेष गुणांचा विकास होण्यास मदत होई ल. म्हणून उमेदवाराची मुलाखत घेत असतांना असे प्रश्न विचारले गेले पाहिजेत ज्या मुळे मंडळाला वर नमूद केलेल्या प्रत्येक क्षेत्रात तो/ती कशी प्रगती करीत आहे याची माहिती होईल आणि त्यांचे मुल्यांकणहि करता येईल. सर्वसाधारणतः प्रश्न विचारणे चांगले आहे त्यामुळे उमेदवाराला मोकळेपणा वाटतो आणि मोकळेपणाने बोलण्याची त्याला संधी मिळते. “मुलाखत मार्गदर्शिका” या नावाने दिलेल्या भागात नमूना दाखल विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी दिलेली आहे. (खाली दिलेली पुरवणी पाहा). आता केवळ हेच प्रश्न विचारू शकता (किंवा विचारले पाहिजेत) असे नाही. “मुलाखत मार्गदर्शिकेने” सेवकीय मंडळाला उमेदवारांचे मुल्यांकन करण्याकरिता पांच क्षेत्राच्या संदर्भातीत प्रश्नांची तरतूद करण्याचा प्रयत्न केला आहे—ते असे.

**मुलाखत मार्गदर्शिका**

(मेनोनाईट मंडळीने विकसीत केलेल्या मुलाखत मार्गदर्शन साहित्यावर आधारित)

- जेव्हा ते येतात तेव्हा ते प्रामाणिकपणे आणि उघडपणे त्यांचा विश्वास, त्यांचा ईश्वरविज्ञानाबद्दलचा समज आणि त्यांना झालेला सेवेचा दृष्टांत उघड करण्याच्या इच्छेने येतात. दुसरी बाजु, काही उमेदवार मुलाखतीस मोठया उत्सुकतेने येतात खरे परंतु ते पाहतात की, त्यांचे स्वतःचे भवितव्य ठरविणे काही सदस्यांच्या हाती आहे. उमेदवाराला मोकळे वाटले उपाय आखले पाहिजेत.

- मुलाखत घेण्याचा उद्देश आणि मुल्यमापनासंबंधी विचारले जाणारे प्रश्न हे दर्शवितात की, मंडळ मुलाखतीमधुन काय समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. मुलाखतीचे प्रश्न नमूना समजून तयार केलेले प्रश्न आहेत ज्यामुळे आवश्यक माहिती मिळू शकेल. तरी पण मुलाखत घेणाऱ्या मंडळाच्या सभासदांकरिता त्यांनी मार्ग दर्शिकामध्ये असलेल्या प्रश्नांविषयी त्यात भर पडवी म्हणून स्वतःचे प्रश्न तयार करावे, आणि हे फार महत्वाचे आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास मार्गदर्शिकामध्ये दिलेल्या

प्रश्नांचा कायदेशिरपणे आणि जशेच्या तश्याच पध्दतीने त्यांचा वापर करावा या उद्देशाने ते प्रश्न तयार केलेले नाहीत.

- ज्या प्रश्नांची उत्तरे होय अथवा नाही अशा पध्दतीने असतात ते जास्त उपयुक्त ठरत नाहीत. अशी प्रश्ने तयार करा ज्यामुळे विचारपूर्वक उत्तरे देण्यास उमेदवाराला प्रोत्साहन मिळेल. त्यांच्याकडून येणाऱ्या वैयक्तिक वृतांताचे स्वागत करा.
  अनुभव–आधारित प्रश्न विचारा. "असे झाल्यास तुम्ही काय कराल" असे न विचारता "असे झाले तेव्हा तुम्ही काय केले" असे विचारा.
- प्रत्येक चांगल्या मुलाखतीत ऐकून घेण्याच्या दोन पध्दती एकाच वेळेस कार्यरत असतात. पहिल्या पध्दतीत उमेदवाराला विचारण्यांत आलेल्या प्रश्नांची सरळ सरळ उत्तरे मंडळ सतर्कतेने ऐकत असतात.
- दुसऱ्या पध्दतीत मंडळाचे सभासद, उमेदवाराने दिलेली उत्तरे अप्रत्यक्षपणे ऐकत असतात परंतु हया पध्दतीमधून अंतर्यामी असलेले उमेदवाराचे चारित्र्य आणि त्याची लायकी समजून येते. ऐकण्याच्या हया दुसऱ्या पध्दतीमधून उमेदवाराचे अधिक अर्थपूणे आणि महत्वाची माहिती कळून येते.

## मुलाखत उद्देश क्रमांकः १

### वैयक्तिक विश्वास

**उमेदवाराचे, सेवकीय पाचारणासंबंधी देवाबरोबर असलेले नाते योग्य आहेत काय हे ओळखून घेणे.**

### मुलाखत घेतांना विचारले जाणारे प्रश्न

देव कशा सारखा आहे?

ख्रिस्ताबरोबर तुम्ही चालता तेव्हा काही घडलेल्या विशेष प्रसंगाचे वर्णन करा. कोणत्या कारणासाठी झगडावे लागले?

तुमच्या जिवनामध्ये असा क्षण आला काय ज्याचे वर्णन तुम्ही परिवर्तन असेल? त्याचे वर्णन करा.

तुमच्या जिवनामध्ये असा क्षण आला काय ज्याचे वर्णन तुम्ही "पूर्ण समर्पण" असे कराल? त्याचे वर्णन करा.

तुमचे देवाबरोबरचे नाते वाढावे यासाठी तुम्ही काय करता?

तुम्हाला केव्हा आणि कशामुळे असे वाटले की, देवाला तुम्ही सेवक व्हावेसे वाटले?

एका व्यक्तिचे नांव सांगा जी व्यक्ति तुमच्या करिता ख्रिस्ती विश्वासाचा नमूना असा राहीला आणि त्या व्यक्तिने तुमच्यावर प्रभाव कसा टाकला?

### मुल्यांकणांची प्रश्ने

उमेदवाराचे देवाबरोबरचे नाते जिवंत आणि वाढीव स्वरूपाचे आहे काय?

तो/ती त्या नात्याबद्दल बोलू शकतात काय ज्यामुळे त्यांचे बोलणे इतरांना सहाय्यकारी होते?

उमेदवाराला हे माहित आहे काय की, देवाची कृपा त्याच्यावर/तिच्यावर आहे? इतरांवरहि आहे? आणि तसे तो स्विकारतो काय?

उमेदवाराला सेवाकरण्याच्या पाचारणाची पुरेशी जाणीव आहे काय?

पवित्र शास्त्रातील तुमची आवडती व्यक्ति कोणती आणि का?

तुमच्या सेवेतील कोणत्या अशा घटना होत आल्या आहेत ज्या तुमच्या विश्वासाला आकार देत आहेत?

तुमचा देवाशी असलेल्या नात्यावर तुमच्या सेवेचा प्रभाव कसा पडला?

देवाबरोबर तुमचे जे नाते आहे ते तुमच्या सेवेत वाढत राहावे यांत तुमचा हेतू कोणता आहे?

**मुलाखत उद्देश क्रमांकः २**

**ईश्वरविज्ञान**

उमेदवाराला ख्रिस्ती सिध्दांताबद्दल पुरेशी माहिती आहे काय जी नॅझरीन चर्चच्या सिध्दांताशी

जुळणारी आहे आणि त्या गोष्टी तो विहित करू शकतो काय हे समजून घेणे.

**मुल्यांकणाची प्रश्ने**

उमेदवारा जवळ दोनीहि जागतीक ख्रिस्ती दृढ विश्वास आणि अद्वितीय असा नॅझरीन ईश्वरविज्ञानावर दृढ विश्वास आहे याबद्दल कोणता पुरावा आहे?

**मुलाखत घेतांना विचारले जाणारे प्रश्न**

जेव्हा एखादी व्यक्ति जिला ख्रिस्ती मंडळीची पार्श्वभूमी नाही, तो तुम्हाला प्रश्न विचारतो, “मी ख्रिस्ती होण्याकरिता काय केले पाहिजे?” या प्रश्नाचे उत्तर तुम्ही कसे देता?

नॅझरीन चर्चचे विश्वासाबद्दलचे जे कलम आहे त्यात
मंडळी ज्यावर विश्वास ठेवते त्याचे वर्णन केले आहे.
परंतु मंडळीच्या बऱ्याच सभासदांमध्ये थोडे मतभेद
आहेत. असे कोणते कलम आहे ज्यावर तुम्हाला वादविवाद
करावासा वाटतो, आव्हाण द्यावेसे वाटते अथवा बंधारण पुस्तक
जे सांगते त्यापेक्षा तुम्हाला भीन्न काही सांगावयाचे आहे?

पूर्वी ज्यावर तुम्ही विश्वास ठेवला होता परंतु आता ईश्वरविज्ञानाच्या
कोणत्या मुद्यामुळे तुमच्या विचांरात बदल झाला आहे?

उमेदवाराला विश्वासाबद्दलचे कलम समजते काय आणि तो/ती ते कलम प्रामाणिकपणे पसंत करू शकते/शकतो काय, जरी प्रत्येक ओळ आणि शब्द यांच्याशी तो/ती सहमत होत नाही तरी ?

तो/ती ईश्वरविज्ञानाबद्दल बुध्दीहुशारीने बोलू शकतात काय आणि पुरेशा सुसंगतपणे दोघांनाही  विश्वासणारा आणि अविश्वासणारा यांना प्रगट करू शकतात काय?

उमेदवार “रूढ” धर्माचा अनुयायी असून त्याच वेळेस त्याचा ईश्वरविज्ञानाचा समज जिवंत उत्साहि आणि क्रियाशील आहे, याचे काही पुरावे आहेत काय?

तुमच्या विश्वासाबद्दलची खात्री देणारी अशी
कोणती गिते अथवा ख्रिस्ती गिते आहेत जी
तुम्हाला आकर्शित करतात?

तुमचा स्वतःचा जो ईश्वरविज्ञानाबद्दल समज आहे
त्यामध्ये कोणत्या अनिश्चितता आहेत ई
श्वरविज्ञान जे तुम्ही समजून घेतले आहे, कोणत्या
लेखकाने आणि शिक्षकाने तुमच्या समजुतीला
आकार दिला आहे?

तुमच्या जिवनामध्ये आलेल्या कोणत्या अनुभवांनी
तुमच्या ईश्वरविज्ञानाबद्दल असलेल्या समजुतीला
आकार दिला आहे?

सेवेमध्ये असतांना तुमच्या अनुभवांनी तुमच्या
ईश्वरविज्ञानावर कसा परिणाम केला आहे?

ईश्वरविज्ञानाच्या अशा कोणत्या कलात्मक
गोष्टींनी
तुम्हाला स्पर्श केला (संगीत, वाङःमय, नाटक
डोळयांना दिसणारे दृश्य इ.)
तुमच्या मंडळीमध्ये असे काही लोकआहेत काय की
जे नॅझरीन चर्चने घेतलेल्या भूमिकेला अमान्य
आहेत? अशा हया मुद्यांवर तुम्ही स्वतः कोणती
भूमिका घेता?

पवित्र शास्त्रातील असे कोणते शास्त्रभाग आणि
असे कोणते सिध्दांतिकविषय आहेत ज्यांचा प्रभाव
तुमच्या
प्रवचनावर पडला आहे?
ख्रिस्ती सिध्दांत समजून घेण्यात सतत वाढ होत
जावी
यासाठी तुम्ही कसली योजना आखता?

**मुलाखत उद्देश क्रमांकः ३**

**पाळकाला करावी लागणारी कामे आणि अवघड कामे**

पाळक सेवकाकडून गुंतागुंतीची अवघड कामे आणि इतर कामे अपेक्षित असतात. ही बाब उमेदवाराने कित्ती चांगल्या रितीने समजून घेतो आणि ती कामे करण्यास तो समर्थ आहे काय हे समजून घेणे.

**मुल्यांकाणांची प्रश्ने**

उमेदवाराला ज्या सेवेकरिता त्याला/ तीला पाचारण झाले आहे त्या सेवेचे प्रात्याक्षित उत्साहपूर्ण जीवन असे सादर करतो/करते काय?

**मुलाखत घेतांना विचारले जाणारे प्रश्न :**

सेवेची कोणती गुंतागंतीची कामे तुम्हाला उत्तेजित करतात? कोणती कामे भयावह वाटतात?

तुमच्या ठायी असलेली कोणती विशेष दाने तुमच्या
सेवाकार्यात उपयोगांत आणता?

विशिष्ट अशी जबाबदारीची क्षेत्रे आहेत काय जे नाकारले जातात?

विशेष दानांची वाढ व्हावी म्हणून तुमची काय योजना आहे?

सेवेचे असे कोणते प्रकार आहेत जे तुम्हाला सर्वा धिक
आव्हानात्मक वाटतात? अशी गुंतागुंतीची कामे करण्याकरिता तुमची क्षमता अधिक सामर्थ्य युक्त व्हावी म्हणून तुमच्याजवळ कोणती योजना आहे?

उमेदवार, अनुशासन लोकांमध्ये करावी लागणारी, आणि पाळकाला लोकांची करावी लागणारी काळजी, अशा हया प्रमुख क्षेत्रात काम करण्याची क्षमता आहे हे तो प्रदर्शित करतो काय?

एखाद्या व्यक्तिचे नांव सांगा ज्याला तुम्ही सेवेचा एक उत्तम नमुना असे समजता. या व्यक्तिची काम करण्याची जी पध्दत आहे, त्याच्या अशा कोणत्या पध्दती आहेत

त्याबरोबर तुम्हाला चढाओढ कराविशी अथवा बरोबरी कराविशी वाटते?

सेवेत असतांना गरजा आणि संधी यांना काही अंत नसतो, तुमच्या वैयक्तिक गरजा भागविण्याकरिता (शारिरीक, आर्थिक, मानसिक, भावनात्मक आणि आध्यात्मिक गरजा) आणि कुटुंबाप्रति अंगावर घेतलेल्या जबाबदाऱ्या याकरिता तुमच्या जवळ काही
योजना आहेत काय?

तुम्हाला विस्मयकारक अशा कोणत्या गोष्टींचा अनुभव आला,जेव्हा तुम्हाला पाळकपण करण्यास सांगण्यात आले?

तुम्ही निराश झाले काय, जेव्हा काही गोष्टी तुम्ही करू नये व काही गोष्टी तुम्हाला कराव्या लागतील असे सांगण्यात आले?

तुम्ही ज्या पध्दतीने सेवा करता त्या सेवेबद्दल तुमची
मंडळी काय म्हणाली?

तुमचे सहकारी काय म्हणाले? तुमचे कुटूंब काय म्हणते?

तुम्ही त्यांच्याशी सहमत आहा काय?

उमेदवाराला, त्याच्या/तिच्या सेवा करण्याच्या सामर्थ्याची आणि कमकुवतपणाची जाणीव आहे काय? तो/ती जेथे अपुरेपणा आहे त्याचा विकास व्हावा अथवा भरपाई व्हावी यासाठी योग्य पावले उचलत आहात काय? आणि अशी क्षेत्रे जेथे सामर्थ्याचा विकास व्हावा आणि देवाने दिलेल्या दानांची वाढ व्हावी, असे होत आहे काय?

तुम्ही कौटूंबिक गरजा, वैयक्तिक गरजा आणि मंडळीच्या गरजा यांचा वेळेवर ताळमेळ कसा करता याचे वर्णन करा.

तुमच्या अनुभवाकडे पाहिले असता तुम्हाला वेगळे असे काय करावेसे वाटले?

तुमच्या सेवाकाळांत अशी परिस्थिती निर्माण झाली काकी जिला तुम्ही "संघर्ष" असे म्हणाले असाल, त्याचे वर्णन करा. त्या संघर्षाला तुम्ही कसे हाताळले?

तुम्हाला असे वाटते काय की, अशा संघर्षाचा बंदोबस्त करण्याच्या पध्दतित बदल व्हावा? तो बदल तुम्ही कसा कराल?

तुम्ही पाळकीय सेवेत असल्यामुळे वैयक्तिकरित्या अथवाकुटुंबात आर्थिकप्रकरणे निर्माण होतात काय?
त्या परिस्थितीला कसे हाताळंता?

ही व्यक्ति, स्वतःची काळजी कुटुंबाची जबाबदारी आणि सेवाकार्य यांचा योग्य ताळमेळ राखू शकते काय?

**मुलाखत उद्देश क्रमांकः ४**

**चारित्र्य (शिल)**

**उमेदवाराचे चारित्र्य पाळकीय सेवेकरिता अनुरूप आहे काय हे ओळखणे.**

**मुल्यांकणांची प्रश्ने**

उमेदवार योग्य सावधगिरी बाळगतो काय आणि त्या सावधगिरीमध्ये त्यावी वाढ होत आहे काय?

**मुलाखत घेतांना विचारले जाणारे प्रश्न**

तुमच्या कुटुंबाच्या मुल वंशाबद्दल आणि कुटुंबात तुमचे स्थान काय आहे, त्याविषयी सांगा. तुम्ही इतक्या वयाचे झाले आहात. तुमच्या प्रमुख आठवणी कोणत्या आहेत? तुमच्या कुटुंबाच्या कोणत्या गोष्टीची तुम्ही वाखाणनी करता? जर त्या गोष्टी तुमच्या मनाविरूध्द घडल्या असत्या तर तुम्ही काय इच्छा केली असती? मनाविरूध्द गोष्टी घडल्या आता शांततेने  राहण्याकरिता कोणती उपाय योजना तुम्ही केली आहे?

ती/तो स्वतः विषयीच्या खरेपणाबद्दल आणि शुध्दतेबद्दल संवेदना व्यक्त करतो/करते काय.

इतर लोक तुम्हाकडे कोणत्या दृष्टीने पाहतात? त्यांचा समज बरोबर आहे काय? मागील पांच वर्षात कोणत्या अनुभवांचा तुमची वैयक्तिक वाढ होण्यावर प्रभाव पडला आहे?

नॅझरीन पुढाऱ्याला शोभेल असा नैतिक दर्जा आहे, याचा पुरेसा पुरावा आहे काय?

तुम्हाला आधार आणि प्रोत्साहन मिळावे म्हाणून तुम्ही काठे व कोणाला पाहता? मिळालेला आधार तुम्ही कसा दर्शविता?

उमेदवाराच्या ठायी त्याच्या/तिच्या हितकारक अशी सावधगिरी आहे कायकी, इतर लोक ती समजून घेतील आणि त्याचा अनुभव त्यांना येईल?

जेव्हा तुम्ही अयशस्वी होता अथवा जेव्हा कोणतीच गोष्ट मनासारखी घडत नाही तेव्हा तुम्ही ती स्थिती

कशी हाताळता? तुमच्या भुतकाळात घडलेल्या अशा काही गोष्टी आहेत काय की

जर त्या उघड झाल्या तर तुमच्या सेवेकरिता अपायकारक ठरतील? अशा घटनांना तुम्ही कसे हाताळले? अशी कोणती वागणूक किंवा कृति आहेत त्या व्यक्तिला सेवेकरिता अपात्र ठरवू शकतात?

अशा पतनापसून तुमचे स्वतःचे संरक्षण व्हावे म्हणून तुम्ही कोणती पावलं उचलणार आहात?

सेवकीय अनुभव घेत असतांना, तुम्ही स्वतःबद्दल काय माहिती घेत आहा? तुम्ही ती कशी समजून घेतली आहे?

सेवेच्या अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्या बहुतेक साध्य झाल्या आहेत असे तुम्हाला वाटते? असे कोणते सेवाकार्य आहे जे  तुम्हाला सामर्थ्य आणि आनंद देते? अशी कोणती सेवाकार्य आहेत जी तुम्हाला सर्वाधिक निराश करणारे आहेत?

ती तुम्हाला कशारितीने आश्चर्यचकित्त करतात?

अशा कोणत्या गोष्टी आहेत, ज्या पुढील येणाऱ्या वर्षात तुमची वैयक्तिक वाढ होण्याकरिता, तुम्हाला त्याकडे विशेष लक्ष द्यावे लागणार आहे? तुम्ही "अस्तीत्वात असणे" आणि "कृति करणे"

यांचे योग्य संतुलन कसे राखाल? सेवेत असतांना तुम्हाला ही जाणीव कधी होते काय की, तुम्ही उमेदवार इतरांशी वागतांना वैयक्तिक संबंधा
उमेदवार इतरांशी वागतांना वैयक्तिक संबंधा
विषयी योग्य मर्यादा आणि भेद राखण्यास सक्षम आहे काय आणि भविष्यांत तो तसा राहिल काय?

भावनात्मक होऊन हल्ला करण्यास तयार होता?

तुम्हाला कधी असे वाटले काय की, तुमच्या मनावरचा ताबा सुटला आहे? अशा परिस्थितीला तुम्ही कसे हाताळता?

**मुलाखत उद्देश क्रमांकः ५**

**सेवाकार्यालय**

**उमेदवाराला, मंडळीच्या सेवेत असतांना कार्या लयीन अधिकार ज्यावर त्याचा अधिकार आहे, तसेच त्याचीदीक्षा झाल्यानंतरहि त्याच्या ज्या जबाबदाऱ्या आहेतत्या तो पेलवू शकतो काय हे ओळखणेः**

**मुलाखत घेतांना विचारले जाणारे प्रश्ने**

तुम्ही सेवेत दाखल होण्याच्या तयारित असतांना तुम्हालाजे सर्वाधिक महत्वाचे शिक्षक लाभले त्यांच्याबद्दल आम्हालासांगा. त्यांच्या शिक्षक या भूमिकेतून तुम्हाला सामर्थ्य देणारी बाब कोणती होती, आणि त्यांच्यासोबत तुमचे नाते कसे होते?

सेवकाला, मंडळीच्या सभासदांवर कोणता अधिकार असतो? पाळक कोणाला जबाबदार असतो?

"तुम्ही कोणत्या अधिकाराने हे करता" येशूला विचारण्यांत आलेला हा प्रश्न आहे. तुम्हाला जर हा प्रश्न विचारण्यांत आला तर तुमचे उत्तर काय असेल?

पुष्कळ लोक वाटत उपदेशक देवाप्रित्यर्थ बोलतो आणि देवाचा तो प्रतिनिधी आहे असे लोकांना सांगतात. सेवक या नात्याने तुम्हाला याचा काय अर्थबोध होतो?

**मुल्यांकणांची प्रश्ने**

उमेदवाराला सेवाकार्यालयाबद्दल पुरेसा आदर आहे काय; परंतु फाजिल आदर नाही ना?

सेवाकार्याला दिलेल्या अधिकारांचा कोणी दुरोपयोग आणि वापर करू नये याची सेवाकार्यालयात पुरेशी संभाव्य कल्पना आहे काय?

उमेदवार हे ओळखून आहे काय की, सेवाकार्या लयाला एखाद्याचे वागणे आणि कृति यामुळे "दिलेले" आणि "मिळविलेले" असे दुहेरी कामकाज करावे लागते?

तुमच्या आणि तुमच्या मंडळीचा संबंध प्रांताध्यक्षांशी आहे, असे माणून प्रांताध्यक्षांकडून तुम्ही काय अपेक्षिता त्याचे वर्णन करा.

तुम्ही एक सेवक आहा म्हाणून लोकांनी तुमच्याबरोबर इतरांपेक्षा वेगळयारितीने कृति करावी अथवा वेगळयारितीनेतुमच्याशी वागणूक करावी असे तुम्ही कधी अपेक्षित केले आहे काय?

तुमच्या सेवाकार्यामुळे तुमच्या पत्नीवर आणि लेकरांवर कशा प्रकारे परिणाम झाला आहे? जेव्हा पासून तुम्हीपाळकीय सेवेत आला तेव्हापासून तुमच्या मित्रांबरोबरच्यासंबंधात काही बद्दल झाला आहे काय?

रविवारी सकाळची उपासना झाल्यानंतर लोकांबरोबर ज्या नमुनेदार परस्पर क्रिया होतात त्यांचे वर्णन करा.

अधिकार आणि तुमच्या हाती असलेल्या अधिकाराचा वापर याबद्दल तुम्ही काय शिकत आला आहात? जेथे तुम्हाला असे वाटले असते की, पाळकाची भूमिका बजावत असल्यामुळे मी काही करू शकलो, जर पाळक नसतो तर मी काही करू शकलो नसतोया अनुभवाचे वर्णन करा.

तुमची ओळख पाळकम्हणून आहे, या ओळखीमुळेतुम्हाला कोणत्या गोष्टीने खूप आश्चर्य चकित केले? तुम्ही पाळकम्हाणून समाधानी आहात काय?

दिक्षेचा अर्थ आणि मंडळीचे प्रतिनिधित्व करणारा पुढारी यांच्या संबंधाबद्दल कोणत्या पातळीवरचे विचार तुम्हाला सुचतात?

तिला/त्याला अधिकाराचे दोनीहि अर्थ समजतात काय म्हणजे ज्याच्या हाती अधिकार आहे “तो” आणि जो अधिकाराच्या हाताखाली आहे “तो”.

**प्रांतिक सेवकीय विकास मंडळास मदत**

**युरेशियातील शिक्षण**

**युरेशियातिल प्रांतिक सेवकीय विकास मंडळाकरिता विकसीत केलेले आणि सादर केलेले.**

**युरेशिया प्रादेशिक क्षेत्रातील विशेष सेवा.**

**युरेशिया प्रादेशिक क्षेत्रात सांगितलेल्या विशेष सेवा—खालील प्रमाणे.**

“विकास करणे (जास्तीचा वेळ), स्वदेशीय बनने (देशाकरिता योग्य), परस्परावलंबी असणे (संबंध जोडणे), स्वावलंबी होणे (प्रतिष्टा, जबाबदारी), पवित्रता जपावी (वैयक्तिक, सामाजिक, काळजी करणारी, न्याय), मंडळी विश्वासु असावी (विश्वासणारा समाज), वेस्लीयन (पवित्रता/सर्वांकरिता), अर्मेनियम (वैयक्तिक जबाबदारी) परंपरा (हस्तांतरण करणे)”.

ही विशेष सेवा—योजना सिध्दिस नेण्याकरिता युरेशियातील शैक्षणिक संस्था कटिबध्द आहेतः

- अधिक आणि चांगले पाळक तयार व्हावेत यासाठी कार्यशिल आणि विविध पध्दतींचा वापर करून गुणदर्शक शिक्षण देणेः दोनीहि केंद्रात आणि विकेंद्रित केंद्रात.
- मंडळीची वाढ, शिष्यत्व, आणि सखोल विकास.
- संपूर्ण क्षेत्रीय विभागातील प्रांत आणि कार्यक्षेत्रे यांचे एक्किरण
- सेवकांची तयारी करीत असतांना अंतरराष्ट्रिय आणि क्षेत्रीय “मूलभूत पुस्तीकेची” मान्यता राखणे.
- बंधु—प्रीतिची बांधणी करा कुशल योजनांना प्रोत्साहन द्या.
- स्वदेशातील शैक्षणिक संस्था आणि शिक्षण देणारे पुढारी वाढवा.
- ईश्वरविज्ञान परिषदा भरविण्याकरिता संधी उपलब्ध करून द्या, ज्यामुळे ईश्वरविज्ञानाधारित संबंध वाढण्यास मदत होईल.
- सेवाकार्याकरिता उपयुक्त ठरतील अशा संसाधणांचा विकास करा जे वाङःमयाशी अर्थपूर्ण संघटित असतील.

युरेशिया क्षेत्रांत वर दिलेली कौशल्यपूर्ण शैक्षणिक प्राथमिकता आणि त्यांच्या गरजा भागविण्याकरिता हेतुपूर्तता आणि कार्यक्षमता लक्षात ठेवून खाली दिलेली रचनात्मक बांधणी तयार केली आहे.

- सेवकांचा शैक्षणिक दर्जा निश्चितपणे उच्च असावा म्हाणून युरेशिया शिक्षण परिषद आणि प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लागार समिती (RCOSAC) लक्षपूर्वक काम करतात.

- प्रादेशिक शिक्षण व्यवस्थापक (REC) नॅझरीन चर्चच्या प्रमुख परिषदेच्या (GA) पातळीवर अशा प्रादेशिक संस्थांचे प्रतिनिधीत्व करतो.
- प्रादेशिक भागांत सात प्रदेशांचा समावेश असतो, त्या प्रत्येक प्रदेशाला प्रादेशिक शिक्षण व्यवस्थापक (FEC) असतो जो प्रत्यक्षरितीने प्रादेशिक क्षेत्रीय शिक्षण व्यवस्थापका बरोबर (EEC) काम करतो. (मध्यंतरी युरेशिया शैक्षणिक रचना (EEC) आणि प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लागार समिती (RCOSAC) यांचे बरोबर काम करतो.
- चार प्रादेशिक शिक्षण व्यवस्थापक (FEC) त्यांच्या प्रदेशांत युरेशिया नॅझरीन विद्यालयाच्या विस्तारीत अभ्यासक्रमात (EuNC) व्यवस्थापक म्हणून सुध्दा काम करतात आणि म्हणून ते युरेशिया नॅझरीन विद्यालयाच्या प्रमुखाला अहवाल सादर करतात.
- क्षेत्रीय शैक्षणिक योजना–दाखला (Certificate), पदवीपत्र (Diploma), पदवी (Degree) आणि बी.ए. (B.A.) एम.ए. (M.A.), डॉक्टरेट (Ph.D.) या पदव्यांना आधार देतात.
- आपल्या सर्व शैक्षणिक प्रयत्नांमध्ये परस्पर प्रामाणिकपणाची भावना आहे आणि म्हणून आपसांत उघडपणे संवाद होतात, ही सेवा म्हणजे “वाटून दिलेली सेवा” अशी आहे.

**EURASIA Education Structure**

# KINDLY REFER THE CHART ON PAGE NO 22 IN THE HAND BOOK (English)

- युरेशिया शैक्षणिक परिषद EEC
  - ❖ अंतरराष्ट्रिय शैक्षणिक मंडळाशी (IBOE) संबंधीत
  - ❖ यामध्ये शिक्षण देणाऱ्या संस्थांचे अध्यक्ष, विद्यालयीन प्रमुख + अंतरराष्ट्रिय शैक्षणिक मंडळाचे प्रतिनिधी (IBOE) +क्षेत्रीय शैक्षणिक व्यवस्थापक(REC), आणि क्षेत्रीय संचालक (RD) यांचा समावेश.
  - ❖ क्षेत्रीय शैक्षणिक तत्वज्ञानासंबंधी सर्व प्रकरणे हाताळणे, आणि नेटवर्कींग आणि शैक्षणिक विकासाकरिता पूरक असे वातावरण पुरवणे.
- क्षेत्रिय अभ्यासक्रम सल्लागार समिती (RCOSAC)
  - ❖ अंतरराष्ट्रिय अभ्यासक्रम सल्लागार समितीशी (ICOSAC) संबंधित.
  - ❖ यामध्ये सर्व शिक्षण देणाऱ्या संस्थेचे अध्यक्ष अथवा विद्यालयीन प्रमुख; + एक प्रादेशिक कुशल व्यवस्थापक (FSC), एक प्रांताध्यक्ष (DS), एक सेवक(clergy), आणि एक साधारण सभासद (Lay person): अंतरराष्ट्रिय अभ्यासक्रम सल्लागार समितीचा क्षेत्रीय प्रतिनिधी (ICOSAC Representative); + प्रादेशिक शैक्षणिक व्यवस्थापक (REC) आणि प्रादेशिक क्षेत्रीय संचालक यांचा समावेश.
  - ❖ प्रादेशिक क्षेत्रामधील सेवकीय अभ्यासक्रमा संबंधी सर्व प्रकरणे हाताळणे आणि पाळकांकरिता पुस्तके पुरविण्याचे व्यवस्थापन करणे.
- सर्व शैक्षणिक संस्था (शिक्षण पुरविणारे), युरेशिया शैक्षणिक परिषद (EEC) आणि प्रादेशिक क्षेत्रीय अभ्यासक्रम सल्लागार मंडळ (RCOSAC) त्या शिवाय त्यांचे घटक प्रांत (Constituendy) यांच्याशी संबंधित
- प्रतिनिधित्व करणे—याचा अर्थ संवाद साधणे (Dialogic) आणि परस्परावलंबी असणे (Interdependant).
- प्रांताचे सर्व शैक्षणिक फायदे शिक्षण पुरविणाऱ्या संस्थामार्फत म्हणजे युरेशिया शिक्षण परिषद (EEC), प्रादेशिक क्षेत्रीय अभ्यासक्रम सल्लागार मंडळ समिती (RCPSAC), प्रादेशिक क्षेत्रीय शिक्षण व्यवस्थापक(REC), जागतिक शैक्षणिक मंडळे/समित्यांचे प्रादेशिक क्षेत्रीय प्रतिनिधी,

क्षेत्रीय संचालक आणि प्रमुखाध्यक्ष मंडळ—मंडळीच्या सर्व स्तरावर पुरविले जातात आणि पुढे अग्रस्थानी पोहंचविले जातात.

**नॅझरीन बंधारण पुस्तक (MANUEAL)**

- बंधारण पुस्तक अध्याय ५ (कलम ४२६—४३५.८) यामध्ये परवाणा आणि सेवकीय नियम यांचा संबंध सेवेच्या सर्व प्रकारच्या शिफारशी येतो—याची रूपरेषा देते.
- बंधारण पुस्तक अध्याय २ (कलम २२६—२३१.४) यामध्ये प्रांतिक सेवकीय मंडळाची (DBM) कर्त व्याची रूपरेषा देते.
- प्रांताध्यक्ष (DS) आणि/अथवा प्रांतिक सेवकीय मंडळ (DBM) यानात्याने वरिल दिलेल्या परिच्छेदांशी चांगले परिचितव्हा आणि सेवाकार्याच्या विकास कार्यक्रमाशी जे सर्व जुडलेले आहेत त्यांना मार्गदर्शन करा आणि वरील नियमांचे पालन करण्यास सांगा.
- एक आव्हान
  - ❖ जेव्हा तुम्ही सेवकीय मंडळावर सदस्यांची निवड करता, तेव्हा तुम्ही काळजीपूर्वक आणि प्रार्थनापूर्वक त्यांची निवड करावी........ सदस्य असे असावे जे लायक आहेत आणि स्वखुशीने तरूण पुरूष स्त्रिया यांनी सेवाकार्यात विकास साधावा याकरिता स्वःची गुंतवणूक करणारे तसेच त्यांना प्रोत्साहन देणारे, सदस्यांसोबत सेवेचा गाडा ओढणारे आणि त्यांना मार्गदर्शन करणारे असे असावे.
- **प्रांतिक सेवकीय मंडळ (DBM).**
  - ❖ **I. प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळ (DMCB)**
    - ➢ २२६ प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळावर पाचा पेक्षा कमी नाही आणि पंधरा पेक्षा अधिक नाही एवढे सभासद राहतील. त्यापैकी एक सभासद प्रांताध्यक्ष असतील. ते चार वर्षापर्यंत सेवा करतील, जोपर्यंत त्यांचे उत्तराधिकारी निवडले जात नाही. ते लायक ठरत नाहीत तो पर्यंत तथापी प्रतिवर्षी मंडळावर प्रमाणशीर सभासदांची निवड केल्यामुळे त्यांच्या सेवेचा काळ डळमळीत होऊ शकतो. (२०३.१५)
    - ➢ २२६.१.१ प्रांतिक परिषदांच्या काळात सेवकीय परवाणा मंडळावर एखादे पद रिक्त झाल्यास प्रांताध्यक्ष त्यावर नेमणूक करून ते पद भरतील (२१२).

- सेवकीय परवाणा मंडळाची निवड झाल्यानंतर प्रांताध्यक्ष सुरळीत कामकाज चालावे म्हणून खालीलप्रमाणे मंडळाची बैठक बोलाऊ शकतातः
- २२७.१ प्रांताध्यक्ष या मंडळाचे पदसिध्द अध्यक्ष म्हणून काम पाहतील. तथापि त्यांच्या/तिच्या विनंतीवरून मंडळाचे अध्यक्षपद सांभाळण्यासाठी हंगामी अध्यक्ष निवडू शकतील जो प्रांतिक परिषदेचे अधिवेषन संपेपर्यंत काम करील. (२१३).
- २२७.२ हे मंडळ आपल्या सभासदांमधुन एक कायम चिटणीस निवडतील, जो प्रांतिक परिषदेच्या खर्चाने कागदपत्रांची नोंदणी योग्य पध्दतीने करील, ही सर्व कागदपत्रे प्रांतिक परिषदेच्या मालकीची असतील. चिटणीस, मंडळाच्या कामकाजाचा सर्व अहवाल काळजीपूर्वक नोंदवून ठेविल आणि विश्वासुपणे मंडळाच्या कामकाजा संबंधीच्या इतर कागदपत्रांबरोबर जतन करून ठेविल आणि आपल्या जागेवर येणाऱ्या दुसऱ्या व्यक्तिकडे हे सर्व कागदपत्रे ताबडतोब हवाला करील.

**२२८ सेवकीय परवाणा मंडळाची कर्तव्ये येणे प्रमाणे**

- २२८.१ दीक्षितवर्ग, सेवकवर्ग आणि सेवक—सनद. यासाठी निवड व्हावी म्हणून ज्या व्यक्ति प्रांतिक परिषदेपुढे यथायोग्य प्रकारे सादर केल्या आहेत त्यांची काळजीपूर्वक परिक्षा घेणे व मुल्यमापन करणे.
- २२८.२ सेवाकार्यासाठी नेमलेल्या पदांसाठी प्रमाणपत्र मिळवू इच्छीणाऱ्या सर्व व्यक्तिंची परिक्षा घेणे, त्यांचे मुल्यमापन करणे यामध्ये स्थानिक मंडळीच्या पलिकडील सेवासाठी मान्यता मिळविणे आणि बंधारण पुस्तकांत नमूद केलेल्या विशेष संबंधाविषयी मुल्यमापन करणे.
- २२८.३ आपणास सेवेसाठी पाचारण झाले आहे असे वाटणाऱ्या प्रत्येक उमेदवारांची काळजीपूर्वक चौकशी करणे आणि पुढील बाबीसंबधाने योग्य त्या प्रकारे पारख करणे या बाबी अशाः त्याचा/तिचा वैयक्तिक तारणाचा अनुभव, पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याने त्याला/तिला आलेला संपूर्ण पवित्रीकरणाचा अनुभव, पवित्र शास्त्रातील विश्वास—सिध्दांताचे ज्ञान, या सर्व विश्वास—सिध्दांताचा पूर्ण स्विकार, प्रमुख आणि विशेष नियम, मंडळीची शासनपध्दत, पवित्र आत्म्याची कृपादाने, देणग्या, बौध्दिक, नैतिक आणि आध्यात्मिक गुणवत्ता, आणि ज्या सेवेसाठी पाचारण

झाले असे उमेदवार म्हणजे त्या सेवेस आवश्यक असणारी सर्वसाधारण शारीरिक क्षमता.

- २२८.४ प्रत्येक उमेदवाराच्या वर्तणूकीची काळजीपूर्वक चौकशी करावी, उमेदवार उत्कृष्ट वर्तणूकित गुंतलेला आहे किंवा नाही, ज्या सेवेकरिता उमेदवाराने अर्ज दिला आहे त्या सेवेमध्ये राहिल्यास सेवेशी विसंगती दाखविल काय हे ओळखून घ्यावे.
- २२८.५ एखाद्या स्थानिक उमेदवाराची तात्पुरता पाळक म्हणून नेमणूक केली असेल, तर अशा नेमणूकीनंतर होणाऱ्या प्रांतिक परिषदेच्या अधिवेशनानंतर त्याची/तिची सेवा पुढे चालू ठेवावी किंवा नाही यासंबंधात मान्यता देण्यासाठी फेरविचार करणे. (४२६.६)
- २२८.६ एखाद्या दीक्षीत सेवकाने प्रांतिक परिषदेला लागोपाठ दोन वर्षे स्वतःचा अहवाल दिला नसेल तर त्याच्या कारणाची चौकशी करणे आणि दीक्षित किंवा सेवक यांच्या प्रकाशित नावाच्या यादीमध्ये त्याचे नांव नोंदणे पुढे चालु ठेवायचे किंवा नाही त्याविषयी प्रांतिक परिषदेकडे शिफारस करणे.
- २२८.७ एखाद्या दीक्षित सेवकाची पुढील बाबीसंबंधाने अहवालांच्या आधारे चौकशी करून त्याचे/तिचे नाव दीक्षित सेवकांच्या यादीमध्ये ठेवायचे किंवा नाही त्यासंबंधात प्रांतिक परिषदेला शिफारस करणेः

  या बाबी खालील प्रमाणे

  (१) त्याने/तिने दुसऱ्या मंडळीचे सभासदत्व स्विकारले आहे किंवा

  (२) तो/ती दुसऱ्या कोणत्यातरी संप्रदायाच्या/गटाच्या सेवेत सामील झाला आहे,

  (३) किंवा अधिकृत परवाणगी घेतल्याशिवाय तो/ती स्वतंत्रपणे काम करीत आहे. (११२, ४३३.११)
- २२८.८ एखाद्या सेवकाने सेवानिवृत्त करावे अशी विनंती केल्यास आणि शारीरिक दुर्बलतेमुळे असा सेवक प्रत्यक्ष सेवा करू शकणार नाही असे मंडळाला वाटल्यास त्याला सेवानिवृत्त करावे अशी शिफारस प्रांतिक परिषदेला करणे किंवा वय झाल्यामुळे सेवानिवृत्त होण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या सेवानिवृत्त वर्गात घालण्याची शिफारस करते. (२०३.२७,४३१).
- २२८.९ एखाद्या सेवकाने आणि सेवक म्हणून काम चालू ठेवण्याचा परवाणा ज्याला मिळालेला आहे, त्याची दुसऱ्या प्रांतात बदली करावयाची झाल्यास आणि मध्यंतरीच्या

काळांत प्रांतिक सल्लागार मंडळाने तसा निर्णय घेतला असेल, तशी शिफारस प्रांतिक परिषदेला करणे (२०३.९,४३२.३२.२).

- २२८.१० अधिकारपत्रे असलेल्या व्यक्ति, दीक्षित,सेवक, सनदी—सेवक आणि ज्यांना निरंतर सेवेत भूमिका बजावण्याचे पाचारण आहे अशांना मध्यंतरिच्या काळांत प्रांतिक सल्लागार मंडळाने (DAB) मान्यता दिलेली आहे, तशी शिफारस प्रांतिक परिषदेला करावी. (२०३.८,४३२.३२.२)

### J.प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB)

- २२९ प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळावर पाच किंवा अधिक दीक्षित सेवक सभासद असतील ज्यांची निवड प्रांतिक परिषदेने केलेली असेल. त्यांचा सेवेचा काळ चार वर्षे आणि त्यांच्या जागेवर दुसऱ्यांची निवड होऊन ते कामावर रूजू होईपर्यंत असेल, तरीपण, प्रतिवर्षी मंडळावर प्रमाणशिर सभासदांची निवड केल्यामुळे त्याच्या सेवेचा काळ डळमळीत होऊ शकतो. (२०३.१६)
- २२९.१ प्रांतिक परिषदांच्या काळात प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळावर एखादे पद रिक्त झाल्यास प्रांताध्यक्ष त्यावर नेमणूक करून ते पद भरतील. (२१२).

**२३० सेवकीय अभासक्रम मंडळाची कर्तव्येः खाली दिल्याप्रमाणे असतील.**

- २३० ज्या प्रांतिक परिषदेमध्ये मंडळाची निवड झाली असेल ती परिषद बंद होण्यापूर्वी प्रांताध्यक्ष अथवा प्रांतिक चिटणीस मंडळाच्या सभासदांची एक बैठक बोलाविल, ज्यामध्ये मंडळाची स्थापना होईल आणि कामकाजाचे वाटप होईल,
  ते येणे प्रमाणेः
- २३०.१ हे मंडळ आपल्या सभासदांमधून अध्यक्षाची निवड करील. हया मंडळाचे सभासद दीक्षित सेवकांमधून चिटणीसाची निवड करील, जो इतर सभासदासह उमेदवारांची परिक्षा घेणे आणि दीक्षा होण्यासाठी आवश्यक तो अभ्यास पुर्ण करून घेणे त्यांची जबाबदारी असेल. ते सर्व विद्यार्थ्यांचे दस्ताऐवज कायम राहावे म्हणुन जपून ठेवतील. (२३०.५,४२४.१—२४.३)
- २३०.२ मंडळाचे अध्यक्ष मार्गदर्शित अभ्यासक्रम कार्यक्रमाच्या पाठयक्रमासाठी प्रवेश दिलेल्या सर्व उमेदवारांची जबाबदारी व देखरेख मंडळाच्या इतर सभासदांवर सोपवून देतील. मंडळाच्या सभासदाच्या कार्यकाळात हे विद्यार्थी —उमेदवार पटलावर नोंदलेले

असे तो, परस्पर मनाने इतर काही व्यवस्था केलेली नसेल, तर वर नमूद केल्याप्रमाणे जबाबदारी पुढे चालू राहील.

- २३०.३ जर ईश्वरेच्छेने अडखळनं आली नाही तर अध्यक्ष मंडळाच्या सर्व बैठकीस हजर असेल, आणि प्रतिवर्षी मंडळाच्या कामावर देखरेख ठेवील. अध्यक्ष काही अपरिहार्य कारणास्तव बैठकीस उपस्थित राहु शकले नाही तर मंडळाचे चिटणीस तात्पुरत्या वेळेकरिता त्याचे/तिचे काम पाहिल.
- २३०.४ मंडळाचे चिटणीस प्रांतिक परिषदेच्या खर्चाने सेवकीय अभ्यासक्रमाची योग्य प्रकारे, नोंदवही मध्ये नोंद करील, ही नोंदवही प्रांतिक परिषदेची मालमत्ता होईल आणि "मूलभूत पुस्तिका" यांत दर्शविल्याप्रमाणे या वहीचा वापर करण्यांत येईल.
- २३०.५ मंडळाचे इतर सभासद मंडळाच्या सर्व सभांना विश्वासुपणे उपस्थित राहतील, तसेच त्यांच्याकडे सोपवून दिलेल्या उमेदवारांचे संदर्भात ते पुढील प्रमाणे देखरेख करतीलः

  (१) त्यांना बंधुभावाने उत्तेजन, सल्ला व मार्गदर्शन देणे.

  (२) सेवकाला उदाहरणाने आणि त्याच्याशी भाषणाद्वारे नैतिकते संबंधाने द्यावे लागणारे प्रशिक्षण देणे, ज्यामध्ये सेवकाने लैंगिक गैरवर्तनाला कसे टाळता येईल यावर जोर दिलेला असेल. (२३०.१)
- २३०.६ हे मंडळ अभ्यासक्रम सल्लागार समितिच्या (COSAC) मार्फत प्रांताध्यक्षांना आणि सेवकीय विकास कार्यालयास सहकार्य करील, आणि जे उमेदवार नॅझरीन महाविद्यालयांत/विद्यापिठांत अथवा सेमिनेरीमध्ये नेमून दिलेला अभ्यासक्रम ज्यांनी चालू ठेवला आहे त्यांना प्रोत्साहन देणे, आर्थिक मदत देणे आणि मार्गदर्शन करणे.
- २३१ सनदी सेवक किंवा इतर उमेदवार यांना विविध पाठयक्रमांचे अभ्यास पूर्ण करता यावे म्हणून मंडळ त्यांच्याकरिता अभ्यासवर्ग किंवा परिसंवाद चालविल; आणि प्रांतिक निधीचा उपलब्धतेनुसार पुस्तके, ग्रंथ सर्वांना मिळावेत यासाठी मंडळ, मध्यवर्ती ग्रंथालये स्थापन करील.
- २३१.१ प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळाचे अध्यक्ष आणि चिटणीस, प्रांताध्यक्षांशी सल्लमासलत करून, सेवकीय शिक्षणाकरिता नेमून दिलेल्या अभ्यासक्रमांत विद्यार्थ्यांची नांवे दाखल करून घेण्याचा अधिकार त्यांना राहिल (२३०.१–३०.२,४२४.१–२४.३)
- २३१.२ सेवकीय अभ्यासक्रमाची "मूलभूत पुस्तिका" या अधिकृत पुस्तकामध्ये नेमून दिल्या प्रमाणे सर्व जबाबदाऱ्या हे मंडळ पार करील.

- २३१.३ हे मंडळ एखाद्या उमेदवाराचा म्हणजे त्याच्या शैक्षणिक प्रगतीचा सर्व अहवाल प्रांतिक परिषदे पूर्वी म्हणजे मंडळाने केलेल्या माहितीची छाणनी वेळेत केल्यानंतर प्रांतिक सेवकीय मंडळाकडे सादर करेल. प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ (DMSB) प्रांतिक परिषदेला उमेदवाराची नेमणूक आणि नेमून दिलेला विविध पदवीप्राप्त अभ्यासक्रम याबाबत प्रांतिक परिषदेला शिफारस करेल. उमेदवाराची अशारितीने झालेली नेमणूक, पुढील अभ्यासक्रम करण्याकरिता अथवा पदवीप्राप्त अभ्यासक्रमाकरिता केलेली शिफारस अभ्यासक्रम सल्लागार समिती (COSAC) मार्फत सेवकीय विकास कार्यालयाने तयार केलेल्या मार्गदर्शनपर तत्वास सुसंगत असतील.
- २३१.४ प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ, (DMSB) मान्यताप्राप्त नॅझरीन संस्थेच्या सहकार्याने अभ्यासक्रम सल्लागार मंडळाकरवी (COSAC) सेवकांची तयारी करण्याकरिता आणि सेवकवर्ग विकास कार्यालय यासाठी जबाबदार राहिल, आणि प्रांताध्यक्षांच्या देखरेखी खाली हे मंडळ दीक्षित सेवक आणि इतर कर्मचारी सेवक यांच्यासाठी प्रांतामध्ये निरंतर शिक्षण देण्याची व्यवस्था करील; निरंतर शिक्षणामध्ये सेवकवर्गाला नैतिकतेसंबंधी घ्यावे लागणारे शिक्षण, ज्यामध्ये सेवकवर्गाच्या सेवकाला लैंगिक गैरवर्तन कसे टाळता येईल यावर विशेष जोर दिलेला असेल.

आपली सर्व रचणात्मक बांधणी शिक्षणाद्वारे मंडळीची सेवा प्रत्येक स्तरावर करावी म्हणून केली आहेः स्थानिक, प्रांतिक, प्रादेशिक, क्षेत्रीय आणि सर्वसाधारण या स्तरांवर केले आहे......... आणि हे सर्व, पुरूषांनी स्त्रियांनी पाळकीय सेवेकरिता आणि इतर आयुष्यभर कराव्या लागणाऱ्या सेवेकरिता त्यांची तयारी असावी म्हणून केले आहे.

**टिप : या दस्ताऐवजा सोबत कॅम्प्युटरवर पॉवर पॉईंट प्रेझेंनटेशन दिले आहे.**

**अधिक आणि अधिक चांगले पाळक शैक्षणिक संस्था, प्रांत आणि सेवकीय उमेदवार यांनी सहकार्याने केलेले काम...**

आव्हानः

हे आव्हान केवळ “अधिक” पाळक तयार व्हावेत यासाठी नाही जरी आम्हाला अनेक पाळकांची आवश्यकता आहे........ परंतु हे आव्हान अधिक “चांगले पाळक” जे यथायोग्य तयार झालेले

आहेत, आणि आयुष्यभर सेवा करण्यास ते तयार राहतील. हा काही आकडेवारीचा खेळ नाही. हे एक महत्वाचे सेवाकार्य असून ज्यामुळे वाढणाऱ्या मंडळयांकरिता बहुसंखेने पाळक तयार होतील.

### ❖ जडण—घडण आणि विशेष सेवा

आम्ही सदैव (सर्व गोष्टित) इतरांची जडण घडण करण्यांत गुंतलेले असतो....... सकारात्मकरितीने अथवा नकारात्मकरितीनेः

| | | |
|---|---|---|
| परिवर्तन | | व्यंगता |
| + | | — |
| | जडणघडण | |
| + | | — |
| सुधारणूक | | विरूपता |
| + | | |

**"जडणघडणाची" सकारात्मक बाजुः**

**परिवर्तन :** जेव्हा एखादी शक्तिशाली घटना (आणिबाणीची घटना) घडते तेव्हा एखाद्याचा स्वभाव नाटकीरूपाने बदलून जातो.

**सुधारणूकः** जेव्हा सामान्य जिवनामध्ये प्रभाव टाकणारी तडजोड केली जाते तेव्हा ही तडजोड विचारांच्या अथवा वागणूकीच्या दिशेमध्ये बदल घडवून आणते.

**"जडणघडणाची" नकारात्मक बाजूः**

**व्यंगता :** जेव्हा वाढ होण्याकरिता लागणाऱ्या आवश्यक अशा प्रमुख घटकांची शरिरात कमतरता येते तेव्हा त्या बाबी एखाद्याला त्याच्या सामान्य विकासांत परिपक्वता येण्यापासून दूर ठेवतात.

**विरूपता :** जेव्हा एखाद्या शक्तिशाली घटनामुळे (आणिबाणीची घटना) एखाद्याचे आरोग्य आणि त्याची परिपक्वता पूर्णपणे तो गमावणार नाही मात्र त्याच्या चारित्र्याला बटटा जरूर लागलेला असेल.

### ❖ शेवट काय आहेः

कलसै १:२५—२९

"............... प्रत्येक मनुष्याला ख्रिस्तामध्ये पूर्ण असे उभे करावे.........."

- ❖ **दीक्षेपूर्वी**
  - ○ **पूर्वी :** अंतरराष्ट्रिय "मूलभूत पुस्तिकेत" मान्यताप्राप्त असलेले आणि क्षेत्रीय अभ्यासक्रम सल्लागार समितीने ठरवून दिलेली कमितकमी प्रमाणबद्धता यांची ज्यांनी पूर्तता केली असेल अशा पुरूषांना आणि स्त्रियांना आपण सेवाकार्यासाठी तयार केलेच पाहिजे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यामुळे मिळणारी पदवी म्हणजे सेवेची फक्त सुरूवात होय !
    - **४ "सी":**

      À समाधान (Content)

      À लायकी (Competency)

      À शील (Character)

      À मागचापुढचा संदर्भ (Context)
  - ○ **परिणाम : अस्तीत्वात असणे To Be**
    - सेवकाकरिता "अस्तीत्वात असणे" –याचे इच्छित परिणाम खाली दिले आहेतः

    – तु देवावर पूर्ण मनाने, पूर्ण जीवाने, पूर्ण शक्तिने व पूर्ण बुध्दीने प्रीति कर, जशी आपणांवर तशी शेजाऱ्यांवर प्रीति कर–जसे शास्त्रवचनांत आज्ञापिले आहे आणि ख्रिस्ताच्या साम्यतेत व्यक्त केले आहे.

    À देवाने केलेल्या पाचारणांत सखोल धर्मनिष्ठेने वास करणे.

    À विश्वासणाऱ्यांच्या समुहाशी अस्तीत्वात असलेली व्यक्ति या नात्याने असणे.

    À निर्विवाद प्रामाणिकपणा आणि प्रतिष्ठा

    À कळवळा, सोशिकपणा आणि चिकाटी

    À स्वतःची वागणूकआणि आत्मसंयम

    À नम्रता, सौम्यता आणि इतरांबद्दल संवेदनशील

À प्रेम आणि धैर्य

À शहाणपणा आणि योग्य ते निवडण्याचे ज्ञान

À दूरदृष्टी आणि समर्पण

- **परिणाम : जाणता असणे (To Know)**
  - सेवकांकरिता जाणता असणे (To Know) याचे इच्छित परिणाम खालील प्रमाणे.

À पवित्र शास्त्राचे आणि त्याचा अर्थ लावण्याचे संपूर्ण ज्ञान.

À स्पष्ट अशी ईश्वरज्ञानाची जाणीव, विशेषकरून त्यामध्ये ख्रिस्ताच्या पवित्रतेची जाणीव

À ख्रिस्ती मंडळाच्या इतिहासाची आणि शतकानुवर्षे करीत असलेली विशेषसेवा यांची पक्की माहीती.

À वेस्लीने दिलेले ईश्वरीविज्ञान, त्याचा वारसा आणि परंपरा यांची माहिती.

À दररोजच्या जिवनांत दिसणारी आध्यात्मिक नियमितता

À विश्वासणाऱ्यांच्या समुहात ख्रिस्ती आराधनाचे महत्व, पध्दती आणि ठिकाण याबद्दलची माहिती.

À ख्रिस्ती व्यक्तिगत आणि सामाजिक नीतितत्वे यांची निश्चित माहिती

À आपले विचार इतरांना सांगण्याबद्दलचे सिध्दांत आणि बोलण्याची कला, विशेषतः देवाचे वचन सांगणे, ज्यामध्ये शिक्षण देणे आणि इतरांबरोबर संभाषण करण्याची कला—यांचे ज्ञान असणे.

À ख्रिस्तासारखे चाकर होऊन पुढारीपण करणे, स्थानिक मंडळीचे व्यवस्थापन करणे, संस्थेकरिता आणि सेवा करण्याचे आदर्श नमुने असणे अशा प्रेरणादायी शक्तिंची स्पष्ट समज असावी, तरीपण ज्या पुढारीपणांत आणि अनुशासनांत ऐहिकपणा आहे त्यापासुन भीन्न असणे याचीहि समज असावी.

Àतुटफुट झालेली मानवी अवस्था दोनीहि व्यक्तिची आणि समाजाची यांची माहिती असली पाहिजे.

Àमानवी जीवन आणि स्थानिक मंडळीत आणि समाजात असलेले गट ज्यामध्ये विवाह आणि कुटुंबाचा समावेश आहे यांच्यात प्रेरणा देणारे सामर्थ्य आहे याची जाणीव असावी.

Àमानवाचा इतिहास आणि संस्कृति यामधील अंतर, विशेषकरून सेवकांच्या स्वतःच्या संदर्भात यांचा अर्थ समजून घेणे.

Àसंस्कृतिचा झुकण्याचा कल आणि त्याचा त्याच काळांत समाजवर झालेला परिणाम ज्यामध्ये धर्म या विषयाचे अनेकतत्ववादांचा समावेश आहे याची जाणीव असणे.

Àसंघटित समाजाची कृति आणि नासोरी मंडळीचे आचरण यांची माहिती असणे.

Àसमाजात असलेले कायदे कानून ज्यामध्ये मंडळी कार्यरत आहे याची जाणीव असणे.

- **परिणाम : कृति करणे (To Do)**

  - सेवकांकरिता "कृति करणे" याचे ईच्छित परिणाम खालील प्रमाणेः

Àनमुनेदार दैवि–जिवन आणि आवश्यक असलेली धार्मिकता

Àउमेदवाराचा वैयक्तिक विकास, कौटुंबिक विकास आणि मंडळीचा विकास याबद्दल प्रार्थनापूर्वक विचार करणे.

Àप्रामाणिकपणे आणि एकदुसऱ्याबरोबर सन्मानपूर्वक काम करणे.

Àदेवाच्या प्रीतित इतरांना प्रतिसाद देणे.

Àदेवाच्या लोकांना उपासनेमध्ये, विशेष कामामध्ये आणि सेवा करण्यामध्ये पुढारीपण करणे.

À सेवाकार्यात संतांना सुसज्ज करणे

À स्पष्टपणे आणि संस्कृतिचे भान ठेवून योग्य पध्दतीने देवाच्या वचनाचे प्रवचन करा.

À बोलण्याद्वारे आणि कित्ता बणून शिक्षण देणे

À हरविलेल्यांना सुवार्ता सांगणे

À कळपाला चारणे

À मंडळीच्या आणि समाजाच्या सेवेबद्दल स्पष्टपणे बोलणे.

À मंडळीच्या आणि समाजची झालेली तुटफुट त्याची सेवा करणे.

À जे सत्य आहे ते प्रीतिने सांगणे

À काळजीपूर्वक आणि बिनशर्तपणे ऐकून घेणे

À स्थानिक पातळीवर असलेल्या देवाच्या सर्व लोकांना सेवेमध्ये मदत करणे.

À गरजेनुसार आणि योग्य वेळी स्थानिक मंडळीला संघटित करणे.

À कार्यक्रमाची आणि योजनांच्या परिणामांचे मुल्यमापन करणे.

À सेवेकरिता आणि विशेष सेवेकरिता आवश्यक लागणारी माहिती देवाचे तत्वज्ञान आणि इतर माध्यमांचे कसब साधुन घेणे.

À आयुष्यभर पुरणाऱ्या शिक्षणाचा पिच्छा पुरावा.

❖ **दिक्षा झाल्यानंतर**

- नंतर : शेवटपर्यंत सेवा करीत असतांना सेवाकार्याच्या विकासामध्ये आपली वाढ होत जाते त्यालाच आपण "जीवनभर शिक्षण" असे म्हणतो.

  À ते चार 'सि' आणि "अस्तीत्वात असणे" "जाणता असणे" "कृति करणे" ही तीन घटके आपल्याकरिता अभ्यासक्रमाच्या विकासाची चौकट म्हणून "जीवनभर शिक्षण" चालू राहतील.

- **अखंड शिक्षण घटकं (CEUS)**

  À आपण “जीवनभर शिक्षणांत” व्यस्त झालो आहोत.

  À आपण खालील गोष्टी उत्कृष्टपणे करण्याकरिता समर्पित आहोत :

  - तयारी करणे
  - जडणघडण करणे
  - सेवा करणे
  - शिष्य घडविणे
  - मंडळीचा विकास करणे

- **अखंड शिक्षण घटकं (CEUS) काय आहे?**

  - प्रत्येक दीक्षित पाळकाने दरवर्षी कमित कमी २ अखंड शिक्षण घटकांत व्यग्र असले पाहिजे. (ज्यामध्ये प्रत्येक घटकास ३० तास विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचा अंतर्भाव असेल)
  - विद्यार्थ्यांचे शिक्षण तास : शिकणाऱ्याला खालील गोष्टी शिकून घेण्यास लागणारे तास–ज्ञान संपादन करणे, दिलेल्या दानांचा सराव करणे, शीलवान–चारित्र्यांत वाढ होणे आणि त्याला/तिला अर्थपूर्ण मार्गांनी इतरांशी संभाषण करणे.
  - अखंड शिक्षण घटकं (CEUS) विषयी अधिक माहितीकरिता “क्षेत्रीय मूलभूत पुस्तिका” पाहा.

टिप : या दस्ताऐवजासोबत कॅाम्प्यूटरवर पावर पॉईंट प्रेझेंटेशन दिले आहे.

सेवकीय मंडळ

अभ्यासक्रम सल्लागार समिती

अखंड शिक्षण घटक

प्रांतिक परिषद

प्रांतिक सल्लागार मंडळ

प्रांतिक सेवकीय मंडळ

प्रांतिक सेवकीय विकास मंडळ

प्रांतिक सेवकीय परवाणा मंडळ

प्रांतिक सेवकीय अभ्यासक्रम मंडळ

प्रांताध्यक्ष

युरेशिया शैक्षणिक परिषद

युरेशिया शैक्षणिक रचना

इस्टर्न मेडिटेरिअन नॅझरीन बायबल कॉलेज

युरेशियन नॅझरीन कॉलेज

क्षेत्रीय शैक्षणिक व्यवस्थापक

क्षेत्रीय कुशल व्यवस्थापक

प्रमुख परिषद

प्रमुख मंडळ

अंतरराष्ट्रिय अभ्यासक्रम सल्लागार मंडळ

अंतरराष्ट्रिय शैक्षणिक मंडळ

नॅझरीन थिऑलॉजिकल कॉलेज

प्रादेशिक अभ्यासक्रम सल्लागार समिती

प्रादेशिक शैक्षणिक व्यवस्थापक

प्रादेशिक संचालक

साऊथ अशिया नॅझरीन बायबल कॉलेज